**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**

**पृ.शी.** : केळशी, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी याकूबशाह बाबा दर्ग्यासाठी इनाम म्हणून दिलेल्या जागेवर अतिक्रमण करण्यात येणे

**मु.शी.** : केळशी, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी याकूबशाह बाबा दर्ग्यासाठी इनाम म्हणून दिलेल्या जागेवर अतिक्रमण करण्यात येणे, या संबंधी ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"केळशी, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे याकूबशहा बाबा यांचा दर्गा असणे, या दर्ग्याचा खर्च चालावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी 653 एकर जागा इनाम दिलेली असणे, परंतु सद्यस्थितीत ही जागा वक्फ बोर्डाकडे असणे, मात्र, या जागेवर मोठया प्रमाणावर अतिक्रमणे झालेली असल्याचे माहे जून, 2015 रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, त्यामुळे दर्ग्याला केवळ एक एकर जमीन खर्चासाठी असणे, या जमिनीवर मोठया प्रमाणावर बागायतदारांनी आंबे लावून जागा ताब्यात घेतलेली असणे, याशिवाय 220 एकर जमिनीत बॉक्साईडचे साठे सापडले असल्यामुळे या जागेला खूप महत्व येणे, या जागेवर अतिक्रमण झाले असल्यामुळे याकूबशहा बाबा यांच्या भाविकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, सबब शासनाने अतिक्रमणे हटविण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीप कांबळे (अल्पसंख्याक विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, केळशी, उतांबर, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे याकूबशाह बाबा यांचा दर्गा आहे. या बाबतची माहिती मी सभागृहाला दोन मिनिटांत देते. या दर्ग्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी 653 एकर जागा इनाम म्हणून दिली होती. परंतु सद्य:स्थितीत या दर्ग्याच्या नावावर केवळ एक एकर जागा आहे आणि इतर सर्व जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्या जागेवर भोगवटादारांची नावे लावून ती जागा अनेकांनी अतिक्रमित केली आहे. सभापती महोदय, हा दर्गा 1952 साली धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत झालेला आहे. त्याच बरोबर वक्फ बोर्डाकडे सुध्दा या दर्ग्याची नोंद झालेली आहे. वक्फ ॲक्टच्या सेक्शन 54-55 नुसार या प्रकरणी दावे झाले. सदरहू दाव्यांप्रकरणी दर्ग्याच्या बाजूने निकाल लागल्यानंतर, कोकण आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी यांच्याकडे दर्ग्यातील लोकांनी वारंवार अर्ज करुन सुध्दा ही जागा त्यांच्या नावे झाली नाही. मुळात ही जागा छत्रपती शिवाजी महाराजांनी सदरहू दर्ग्यासाठी इनाम म्हणून दिली होती. या संदर्भातील ताम्रपट आजही अस्तित्वात आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडे इंग्रजकालीन Alienation Registar आहे. त्यामध्ये याची नोंद आहे. बोट खतामध्ये सुध्दा याची नोंद आहे. पीटीआर वर सुध्दा 653 एकर जमीन 1952 पासून दर्ग्याकडे असल्याचे नमूद आहे. तथापि या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले असून, त्या ठिकाणी कलम बागा उभारण्यात आल्या आहेत. या जागेपैकी 220 एकर जागेवर बॉक्साईडचे साठे सापडले आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, शासन सदरहू अतिक्रमित जागा पुन्हा याकूबशाह बाबा दर्ग्याच्या नावावर करुन देणार काय ? तसेच हे क्षेत्र धार्मिक क्षेत्र, पर्यटन क्षेत्र आणि ऐतिहासिक क्षेत्र म्हणून प्रसिध्द असल्यामुळे, या क्षेत्राचा शासनाकडून विकास करण्यात येईल काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, केळशी येथील दर्ग्याची देखभाल व दुरुस्ती तसेच इतर सर्व बाबींसाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी 653 एकर जागा इनाम म्हणून दिलेली आहे. त्या जागेवर अनेक लोकांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे. सध्या केवळ एक एकर जागा दर्ग्याच्या नावावर आहे. वक्फ बोर्डाने मध्यंतरी या बाबत सुनावणी घेऊन काही लोकांवर नोटीसा काढल्या होत्या. सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, ही सर्व जागा या दर्ग्याच्या ट्रस्टला

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे....

मिळण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल. या प्रकरणी एक-दोन महिन्यात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा सर्व संबंधित अधिकाऱ्यांची मंत्रालयात किंवा प्रत्यक्ष रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात सुनावणी घेऊन ही संपूर्ण जागा सदरहू ट्रस्टला देण्याबाबत शासन पूर्णपणे विचार करेल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर असून, हा तुम्हा-आम्हाला असलेला ऐतिहासिक ठेवा आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, या दर्ग्याच्या नावावर केवळ एक एकर जागा आहे. परंतु ते चुकीचे आहे, हे उत्तर मागे घ्यावे. महोदय, त्या कालखंडात जाणता राजा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी 653 एकर जागा या दर्ग्यासाठी दिलेली होती. ती तुम्ही-आम्ही दिलेली नाही. या संदर्भात कोणी काय केले आणि कोणी काय केले नाही, हे मी सांगत नाही. हा प्रश्न सोडविणे महत्त्वाचे आहे. हे माझे गाव आहे. दापोली तालुका माझा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या सरवरी मौलवींना स्वतःचा गुरु मानले होते. ते त्यांच्या चरणी येऊन बसायचे. त्यांच्याशी सल्ला-मसलत करायचे. त्यामुळे पीर वल्लीला या दर्ग्याची देखरेख करण्यासाठी आणि त्या दर्ग्याची संपूर्ण निगा राखण्यासाठी किंवा उदरनिर्वाहासाठी 653 एकर जागा इनाम म्हणून दिली होती. यामध्ये महत्त्वाचा विषय वेगळा आहे. या जमिनीमध्येच अलीकडे बॉक्साईडचे साठे सापडले आहेत. त्यामुळे त्या जमिनीवर अलीकडे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले आहे. पूर्वी त्या जमिनीवर अतिक्रमण नव्हते. त्या भागात गेल्या 5-6 वर्षात मोठ्या प्रमाणावर मायनिंग झाल्या. त्यामुळे तेथील बॉक्साईड काढण्यासाठी स्थानिकांनी त्या जागेवर अतिक्रमण करुन, त्या जमिनी ताब्यात घेतल्या आहेत. दुर्दैवं असे की, वक्फ बोर्डाने घेतलेला निर्णय उच्च न्यायालयाने सेट-असाईड केला. माननीय उच्च न्यायालयाच्या संदर्भातील कोणत्याही निर्णयाच्या बाबतीत मी वक्तव्य करणे योग्य नाही. परंतु माननीय उच्च न्यायालयाने सेट-असाईड करताना जो निर्णय दिला तो महत्त्वाचा आहे. एस.डी.ओ, जिल्हाधिकारी किंवा सरकार असेल, या सर्वांनी या प्रकरणामध्ये वक्फ बोर्डाने जो निर्णय दिला आहे तो माननीय उच्च न्यायालयाने यासाठी सेट-असाईड केला होता की, या विषयी अंतिम सुनावणी घेऊन तत्काळ कार्यवाही करावी. महोदय, हे ठिकाण ऐतिहासिक आहे. हा ऐतिहासिक ठेवा म्हणून तुम्हा-

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

आम्हाला अभिमानास्पद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या जाणत्या राजाचा हा मनाचा मोठेपणा आहे. त्यामुळे या वास्तूंचे खऱ्या अर्थाने संरक्षण करावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.विजय गिरकर, या विषयाची व्याप्ती 375 वर्षापेक्षा जास्त आहे. आपण सुध्दा याच तालुक्यातील आहात. सर्व-धर्म-समभाव यापेक्षा कोणी मोठा असू शकत नाही.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ....

छत्रपतींच्या नावाने काही मंडळी (अडथळा) आता भाई म्हणाले ते बरोबर आहे .... दुकानदारी करी आहेत. छत्रपतींचा खरा वारसा सर्वधर्म समभावाचा आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या मताशी मी सहमत आहे. ऐतिहासिक वारसा आहे. शासनाने उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एसडीओ किंवा तलाठ्यापासून जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत कोणाकडूनही चौकशी करून संपूर्ण अतिक्रमणे दूर कधी करणार आणि त्या जागेचे प्रिझर्व्हेशन कधी करणार ? कारण छत्रपतींनी दिलेला सर्वधर्म समभावाचा ठेवा जगाला मार्गदर्शक आहे.

श्री. दिलीप कांबळे सभापती महोदय, केळशी, ता. दापोली, जि. रत्नागिरी हे गाव केवळ सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचे नाही तर महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या दर्ग्यासाठी दिलेली जागा हा ऐतिहासिक ठेवा आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, ते गाव माझेही आहे आणि महाराष्ट्राचे, देशाचे आणि जगाचेही आहे असे म्हणावे. भाई जगतापांचे नाही, बाकी सर्वांचे आहे असे म्हणून कसे चालेल, मला आपण बाहेर काढता का ? आंबेडकरी चळवळीमध्ये काम करताना ....

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांच्याबरोबर राज्यातील प्रत्येक व्यक्तीचे केळशी हे गाव आहे. ते ऐतिहासिक गाव आहे. छत्रपती शिवरायांनी या दर्ग्यासाठी दिलेली जागा ऐतिहासिक आहे. ऐतिहासिक ठेवा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतलेला निर्णय आहे. तेथे कोण्ीही मंडळींनी अतिक्रमणे केली असतील तर या सर्वांवर कारवाई करण्यत येईल. वक्फ बोर्डाने 141 जणांना नोटीसा देख्ील काढलेल्या आहेत. 6 ऑगस्टला या संदर्भातील पुढील सुनावणी आहे. मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांत हे सर्व संबंधित आणि वक्फ बोर्डाचे अधिकारी मिळून त्या ठिकाणी सुनावणी घेतली जाईल. एक इंच देखील जागा कोणाही अतिक्रमण करणाऱ्याच्या घशात जाऊ देणार नाही, एवढे मी आपल्यामार्फत सभागृहाला सांगू इच्छितो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. हुस्नबानू खलिफे यांनी अत्यंत महत्त्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली आहे. याकूबशहा बाबा यांच्या दर्ग्याला 653 एकर जमीन देण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्व:धर्माबरोबर दुसऱ्यांच्या धर्माचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण ....

आदर कसा करावा हे शिकविले. मात्र त्यापासून काही तरी बोध घेण्याचे सोडून त्यांच्या नावाचे मार्केटिंग लोक करतात हे आपणही अनुभवले आहे. मला असे वाटते की, हा मॅटर गांर्भीयाने घेतला पाहिजे. कारण हे जमिनीचे प्रकरण आहे. वक्फ बोर्डाने अतिक्रमण काढून टाकण्यासाठी नोटीसा बजावून 70 लोकांविरूध्द कारवाई करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यात ते यशस्वी ठरले नाहीत. आता उच्च न्यायालयाने आदेश देऊन 141 अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीसा दिल्या आहेत. नोटीसा देऊन काहीही होणार नाही. आपल्याला माहीत आहे की, एखादी चोरी ही चोरी असते, तशी ही जमिनीची चोरी आहे. ही चोरी खपवून घेतली तर योग्य होणार नाही. दुसऱ्याच्या जमिनींमध्ये जाऊन अतिक्रमण करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. आपल्याला असे होऊ द्यायचे नसेल तर फक्त नोटीसा बजावून चालणार नाही, त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे. शासन त्यांच्यावर कडक कारवाई करणार का ? 220 एकर जमिनीमध्ये बॉक्साईडचे साठे सापडले आहेत, त्याची खात्री करून शासन त्यावर काही योग्य निर्णय घेणार का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, मुळात ही सर्व जमीन दर्ग्याची आहे. त्यामुळे सर्व जमिनीची मालकी दर्ग्याकडे आहे. शासन पूणपणे या दर्ग्याच्या, ट्रस्टच्या बाजूने आहे. मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, एक इंचही जमीन अतिक्रमण करणाऱ्यांच्या घशात जाऊ देणार नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. हूस्नबानू खलिफे यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. याकूबशहा बाबा यांचा दर्ग्याकडे 653 एकर इनामी जमीन आहे. राज्यातील, देशातील हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या दृष्टीने अशी सर्व ठिकाणे फार महत्त्वाची व संवेनशील आहेत. आपण आताच या संदर्भात सर्व कार्यवाही करण्याची घोषणा सभागृहात केली. परंतु या कार्यवाहीमध्ये असंख्य अडथळे येण्याची शक्यता आहे. हा प्रश्न पुढे पुढे जाण्याची शक्यता आहे. कालपासून आम्ही सभागृहात आग्रह धरत होतो. शासनाच्या मनात खरोखर असेल तर हे सर्व लवकर होऊ शकेल. त्यामुळे सर्व प्रकरणांमध्ये लक्ष घालावे. 653 एकरचा भूखंड आहे, त्यातील बॉक्साईड असलेला भाग सोडून, आपण सामाजिक सामंजस्याचे एक मोठे केंद्र या संबंध

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

जागेत उभारू शकतो, या ट्रस्टला त्यासाठी मदत करू शकतो. समाजात चांगला संदेश जाण्याची चांगली माठी संधी चालून आली आहे. आपण याचे प्राधिकरणही करू शकाल आणि त्यामधून ऐक्याचा संदेश देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजापासून चालत आलेल्या परंपरेचे जनत करून, ती परंपरा सातत्याने पुढील पिढीलाही कळावी यासाठी प्रयत्न करू शकाल. सामंजस्य केंद्र निर्माण करण्याची संधी या ट्रस्टच्या माध्यमातून आपल्याकडे चालून आली आहे. आपण त्या दृष्टीने विचार करावा. याचा पूर्ण विकास करणे, त्या ट्रस्टला आवश्यक निधी देणे, सापडलेल्या बॉक्साईडवर त्यांचा अधिकार असेल तर त्याच्या बदल्यात त्यांना जे काही मिळणे आवश्यक आहे ते देणे आणि अतिक्रमण हटविणे या दृष्टीने एक मोठी योजना शासन हाती घेईल का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला विचार सदनात मांडला आहे. मात्र शासनासमोर मुख्य प्रश्न या ठिकाणावरील अतिक्रमणे हटविणे हा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांकडून ही जागा या ट्रस्टला मिळाली आहे. सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केली आहे की, सध्याचे वातावरण पाहता देशात, राज्यात सामजिक ऐक्याचे एक चांगले केंद्र उभे करता येईल. शासन त्या दृष्टीने नक्की विचार करेल. तेथे बोक्साईड आढळून आले आहे, त्याच्या बदल्यात ट्रस्टला नेमके काय देता येईल हे पहावे असेही त्यांनी सांगितले आहे. शासन या संदर्भातही नक्की विचार करेल. मी सुरूवातीलाच सांगितले की, या ट्रस्टची जागा असल्यामुळे यातील कोणतीही जागा अतिक्रमण केलेल्या व्यक्तींच्या ताब्यात जाऊ देणार नाही या दृष्टीने सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देईन. छत्रपती शिवाजी महाराजांनी एका मुस्लीम दर्ग्याला जमीन दिली, ही ऐतिहासिक गोष्ट आहे. तो इतिहास जनतेला समजला पाहिजे, त्यामुळे हा दर्गा पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करून, पुराण वस्तू संशोधन खात्याकडे तो वर्ग करून योग्य कार्यवाही करावी. छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त हिंदूचेच नव्हते तर सर्व धर्मांचे होते. शासन हा इतिहास सांगण्यासाठी गंभीरपणे विचार करेल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

का ? वक्फ बोर्डाच्या जागांवर अतिक्रमणे होत आहेत. वक्फ बोर्डाच्या जागा सुरक्षित राहण्यासाठी शासन दक्षता घेऊन त्यासाठी खास तरतूद करेल का ? ..4



श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, ही जागा या ट्रस्टची आहे. त्यामुळे ती पुरातत्व विभागाकडे देण्याचा आता शासनाचा कोणताही मानस नाही. आता शासनासमोरील मुख्य प्रश्न तेथील सर्व अतिक्रमणे हटविणे एवढाच आहे. ती अतिक्रमणे काढण्याच्या दृष्टीने शासन पूर्णपणे प्रयत्न करेल.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे यांनी वर्षभरापूर्वीच या विभागाचा कार्यभार घेतला आहे. शिवसेनेचे सदस्य या विषयावर बोलत आहेत, त्यांना आपण सहकार्य द्याल, अशी मला आशा आहे. परंतु, आपल्या सर्वांच्या लक्षात असेल की, वक्फ बोर्डाच्या जमिनींच्या अनेक न्यायालयीन प्रकरणात सरकारी वकील फुटतात आणि विरुध्द पक्षाला अतिक्रमण करण्यास मदत करतात. या बद्दलचे अनेक अहवाल आपल्यासमोर आलेले आहेत. त्यामध्ये बड्या बड्या धेंडांचा समावेश आहे. मी स्वत: या संदर्भात एक लक्षवेधी सूचना दिली होती. आम्ही सर्वांसाठी काम करीत असतो.

सभापती महोदय, मुद्दा असा आहे की, वक्फ बोर्डाच्या अशा किती तरी जमिनी आहेत की ज्यावर अतिक्रमण झालेले आहे. त्यामध्ये न्यायालय प्रत्येक वेळी वक्फ बोर्डाचे निर्णय बाजूला का ठेवत आहे, आपले वकील बाजू मांडण्यामध्ये कमी पडतात का, याचा कायदेशीर रिव्ह्यू घेणे गरजेचे आहे. या दाव्यांमध्ये कोर्टाच्या संरक्षणाखाली निर्णय घेतले जातात. केळशी प्रकरणात सुध्दा न्यायालयाच्या आदेशानुसार पुन्हा चौकशी सुरु आहे. त्यामुळे योग्य सरकारी वकील नेमण्यासंदर्भात शासन भूमिका घेणार आहे का ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, केवळ दापोली तालुक्यातील केळशी येथीलच नाही तर राज्यातील वक्फ बोर्डाच्या दर्गा, मशीद किंवा दफनभूमीसाठी राखून ठेवलेल्या जमिनींवर अतिक्रमण झाले असेल अशा सर्व जमिनीसंदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी भीती आणि संशय व्यक्त केला आहे. वक्फ बोर्डाच्या बाजूने उभे करण्यात आलेले वकील विरुध्द पक्षाला मॅनेज होतात, अशा काही घटना पूर्वीच्या कालखंडात घडल्या असतील तर वक्फ बोर्डाच्या बाजूने चांगले वकील दिले जातील व ते समोरच्या पक्षाला मॅनेज होणार नाहीत, याची काळजी सरकार नक्की घेईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदय अतिशय सकारात्मक उत्तर देत आहेत. हा कोर्टाचा विषय असून कोणाचा व्यक्तिगत विषय नाही. परंतु, हे उत्तर देत असताना आपण एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. बॉक्साईटच्या साठ्याचा उल्लेख सभागृहात वारंवार केला जात आहे. बॉक्साईटच्या साठ्याला आपल्याला हात लावता येणार नाही. ती जमीन जरी ट्रस्टची

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.......

असली किंवा कोणाची असली तरी बॉक्साईटच्या साठ्याला आपल्याला हात लावता येणार नाही. त्यामुळे या साठ्याचे पूर्ण संरक्षण करणे, तेथील अतिक्रमणे हटविणे आणि कोर्टाचा निर्णय आल्यानंतर सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वातावरण कलुषित होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. सरकारने या प्रकरणी हस्तक्षेप करुन पोलिसांच्या संरक्षणात अतिक्रमणे हटविण्याचे काम केले पाहिजे.

सभापती महोदय, त्या ठिकाणी 653 एकर जमिनीपैकी आता फक्त एक ते दीड एकर जमीन अतिक्रमणविरहित राहिलेली आहे. उर्वरित सर्व जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. सुनावणी घेऊन निर्णय केवळ कागदावर राहतो. सामाजिक सलोखा टिकवून, पोलिसांचा बंदोबस्त देऊन सरकार यामध्ये लक्ष घालणार आहे का आणि हा सगळा गुंता सोडविणार आहे का ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, अतिक्रमणे हटविण्याबाबत किंवा सुनावणी बाबत सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी भीती व्यक्त केली आहे. तेथील सामाजिक वातावरण दुषित होणार नाही, यासाठी पूर्ण क्षमतेने पोलीस बंदोबस्त लावला जाईल. आपल्या मार्फत मी सदनाला सांगू इच्छितो की, बॉक्साईट किंवा अन्य खनिज संपत्तीसाठी या क्षणापासून पोलीस बंदोबस्त लावण्यात येईल.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, या ठिकाणाला मी प्रत्यक्ष भेट दिली असता तेथे जाण्यासाठी रस्ता देखील नाही, अतिक्रमणे मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहेत, त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा विकास करण्यात आलेला नाही, असे निदर्शनास आले आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न अद्यापही अनुत्तरीत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दाभोळ बंदरावर स्वारी केली त्यावेळी ते या दर्ग्यामध्ये वास्तव्यास होते. बाबांच्या आदेशानुसार ते स्वारी करण्यास गेले आणि त्यांना त्यात यशही मिळाले. हे एक धार्मिक केंद्र देखील आहे आणि मोठ्या प्रमाणात हिंदू संत आणि फकीर हे तेथे वास्तव्यास असत, हे महाराजांनी देखील पाहिले आहे. या दर्ग्याच्या तिन्ही बाजूंनी समुद्र असून अतिशय सुंदर असा समुद्र किनारा आहे. त्यामुळे ते एक प्रेक्षणिक पर्यटनस्थळ देखील आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन ऐतिहासिक केंद्र, पर्यटन केंद्र आणि धार्मिक क्षेत्र या तिन्ही अंगांनी या क्षेत्राचा विकास करण्यासाठी शासन काही योजना आखणार आहे का ?

..3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माझे तीन प्रश्न आहेत. एका सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली आहे की, हे ठिकाण पुरातत्व विभागाकडे हस्तांतरित करण्यात यावे. हे क्षेत्र या विभागाकडे हस्तांतरित करु नये, असे माझे मत आहे. तसे शासन करणार का ?

सभापती महोदय, औरंगाबाद, परभणी किंवा महाराष्ट्रातील अन्य शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वक्फ बोर्डाच्या जमिनी आहेत व त्या जमिनी अनेक मोठ्या धेंडांनी बळकावल्या आहेत. त्या जमिनी परत घेऊन संबंधितांविरुध्द शासन कारवाई करणार आहे का ?

सभापती महोदय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, केळशी येथील अतिक्रमणे कोणत्या कालावधीत झाली आहेत ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, या राज्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनी अनेक शहरांमध्ये आहेत, त्या सर्व जमिनी वक्फ बोर्डाच्या ताब्यात घेतल्या जातील. सन 2012 च्या दरम्यान केळशी येथे अतिक्रमणे झाल्याचे लक्षात आले आहे व त्या दृष्टीने उच्च न्यायालय व वक्फ बोर्डाच्या वतीने काही कार्यवाही करण्यात येत आहे. या राज्यातील वक्फ बोर्डाच्या सर्व जमिनींबाबत शासन कार्यवाही करणार आहे आणि या सर्व जमिनी वक्फ बोर्डाच्या ताब्यात घेतल्या जातील.

-----------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यात पत्रकारांवरील हल्लात झालेली प्रचंड वाढ

**मु.शी.** : राज्यात पत्रकारांवरील हल्लात झालेली प्रचंड वाढ यासंबंधी श्री.धनंजय मुंडे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.सुनील तटकरे, हेमंत टकले, जयवंतराव जाधव, किरण पावसकर, अमरसिंह पंडित, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात गेल्या तीन वर्षात जवळ-जवळ 265 पत्रकारांवर हल्ले झालेले असणे, त्यांच्यावर खोटे खटले दाखल करुन प्रसिध्दी माध्यमांचा आवाज बंद करण्याचा वेळोवेळी प्रयत्न झालेला असणे, राज्यातील 42 दैनिके, वाहिन्या व साप्ताहिकांच्या कार्यालयांवर हल्ले झालेले असणे, प्रचलित कायद्यानुसार पत्रकारांवरील हल्ल्यातील एकाही आरोपीला शिक्षा झालेली नसल्याने राज्यात पत्रकार संरक्षण कायद्याची सातत्याने होत असलेली मागणी, लोकप्रतिनिधी, महिला, मागासवर्गीय, डॉक्टर तसेच शासकीय कर्मचारी यांना कायद्याचे संरक्षण असताना केवळ पत्रकारांना संरक्षण नसल्याने त्यांचेमध्ये निर्माण झालेली भीतीची भावना, राज्यामधील विविध पत्रकार संघटनानी एकत्र येत स्थापन केलेली महाराष्ट्र पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, या समितीमार्फत कायद्याच्या मागणीसाठी वेळोवेळी करण्यात आलेली निदर्शने, आमरण उपोषण, रस्ता रोको, हेल्मेट घालून केलेली आंदोलने, या समितीने वेळोवेळी राज्य सरकारकडे दिलेली निवेदने, प्रेस कौन्सिलच्या धर्तीवर राज्यामध्ये पत्रकारांसाठी कौन्सिल असावी अशी होत असलेली मागणी, पत्रकारांवर हल्ला हा अजामिनपात्र गुन्हा ठरवावा आणि पत्रकारांवरील हल्ल्याची न्यायालयीन प्रकरणे जलदगती न्यायालयामार्फत चालविण्याविषयी पत्रकारांची होत असलेली मागणी, पत्रकारांना संरक्षण देण्यात शासन उत्सुक नसल्याची पत्रकारांमध्ये निर्माण होत असलेली भावना, लोकशाही बळकटीकरणाच्या दृष्टीने या महत्वाच्या बाबीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत निर्माण झालेले नाराजीचे वातावरण, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यातील पत्रकारांच्या संरक्षणाच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना आहे.

सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील पत्रकार त्यांच्या सरंक्षणासाठी कायद्याची मागणी करीत आहेत. या ठिकाणी गृह राज्यमंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उपस्थित आहेत. हा विषय पत्रकार संरक्षण कायदा आणि कौन्सिल गठीत करण्याबाबतचा असल्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी स्वतः या चर्चेला उत्तर दिले असते तर या लक्षवेधीला न्याय मिळाला असता. गृह राज्यमंत्री महोदय सक्षम आहेत, याबद्दल वाद नाही. पण हा कायदा करण्याचा आणि कौन्सिल गठीत करण्याचा विषय आहे.

सभापती महोदय, आज पत्रकारांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले होत आहेत, हे आपण पहातो आहोत. मागील अडीच वर्षात 187 पत्रकारांवर हल्ले झाले आहेत. गेल्या 7 महिन्यात पत्रकारांवरील हल्ल्याच्या 43 घटना घडल्या आहेत. सरासरीने 5 दिवसात एका पत्रकारावर हल्ला होत आहे. चार दिवसांपूर्वी बातमीसाठी गेलेल्या एका महिला पत्रकाराची छेड काढून मारहाण करण्यात आली. मिरारोड येथील डान्स बारवरील धाडीची माहिती घेण्यासाठी गेलेल्या राघवेंद्र डुबे या पत्रकाराची हत्या करण्यात आली. अशा प्रकारच्या वाढत्या हल्ल्यांपासून संरक्षण मिळावे, या मागणीसाठी पत्रकारांची आंदोलने देखील होत आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून राज्याचे मुख्यमंत्री, विधिमंडळाचे जवळ जवळ सर्व सन्माननीय सदस्य, राज्याच्या दोन्ही सभागृहांचे सन्माननीय विरोधी पक्षनेते यांना पत्रकार हजारो मेसेज पाठवित असून पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायद्याची मागणी करीत आहेत.

सभापती महोदय, या लक्षवेधीच्या निवेदनातून शासनाने अतिशय गोलमोल स्वरूपाचे उत्तर दिलेले आहे. पत्रकारांच्या संरक्षणाबाबत सरकारचा हेतू चांगला नसल्याचे या उत्तरातून स्पष्ट होत आहे.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

मग मागील तीन वर्षात 77 पत्रकारांवर हल्ले झाल्याचे लेखी उत्तरात कसे काय नमूद केले ? एकीकडे शासन माहितीच्या अधिकारात आमच्याकडे अशी माहिती उपलब्ध नाही, असे सांगते आणि दुसरीकडे मात्र 77 घटना घडल्याचे सांगितले जाते. पत्रकार श्री.अकिल यांच्यावर खरी बातमी छापली म्हणून राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल झालेला आहे. वर्षभरात 50 पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल झाले आणि सरकार मात्र एकाही पत्रकारावर खोटा गुन्हा दाखल झाला नसल्याचे सांगते. पत्रकारांवरील हल्ल्याची तातडीने दखल घेण्यात येते, असेही उत्तरात म्हटले आहे. अशी लोणकडी सरकारने मारली. मात्र सरकार म्हणते त्या प्रमाणे पत्रकारांवरील हल्ल्याची दखल घेतली असती तर अनेक आरोपींना शिक्षा झाली असती. पत्रकारांनी मागणी केल्यास त्यांना पोलीस संरक्षण देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे लेखी उत्तरात म्हटले आहे. आम्ही त्यांना पोलीस संरक्षण देऊ, असेही लेखी उत्तरात म्हटले आहे. सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, शासनाने पत्रकारांच्या संरक्षणाचा कायदा तत्काळ करणे आवश्यक आहे, तरच लोकशाहीचा चौथा स्तंभ जीवंत राहू शकतो, पवित्र राहू शकतो. अशा हल्ल्यांमुळे पत्रकारीता व्यवस्थित करता येईल की नाही, असा प्रश्न पत्रकारांच्या मनात निर्माण झालेला आहे. शासनाने एक तर कायदा करावा, नाही तर प्रेस कौन्सिलच्या धर्तीवर इतर राज्यात पत्रकारांच्या संरक्षणासाठी कौन्सिल घटित केल्या आहेत त्या प्रमाणे कौन्सिल घटित कराव्यात. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझे तीन प्रश्न आहेत. पत्रकारांच्या संरक्षणाच्या कायद्याबाबत सरकारची भूमिका काय आहे, आपण कायदा करणार आहात का कौन्सिल घटित करणार आहात, हे देखील स्पष्ट होणे आवश्यक आहे आणि कायदा करताना फक्त पत्रकारांच्या संरक्षणाचा कायदाच नाही तर पत्रकारीतेच्या एका काळानंतर त्यांना पेन्शनची सुद्धा आवश्यकता आहे, याबाबत सुद्धा शासन काही भूमिका स्पष्ट करणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून पत्रकार हल्ला विरोधी कायद्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी या संदर्भात जे प्रश्न उपस्थित केले त्या संदर्भात निश्चितपणे या राज्यात लोकशाहीच्या माध्यमातून



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे...........

लोकशाही अस्तित्वात ठेवण्यासाठी पत्रकारांची आणि मीडियाची अत्यंत गरज आहे, हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पत्रकारांवर जे हल्ले होतात त्या संदर्भात त्यांनी अनेक संदर्भ देत 3 प्रश्न उपस्थित केले. मी सांगू इच्छितो की, मागील काळात या संदर्भात राणे समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीमध्ये 5 सदस्य होते आणि त्या समितीचा अहवाल देखील आलेला आहे. ज्यावेळी ही समिती नेमली त्यावेळी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर पत्रकारांवर जे हल्ले होतात त्या संदर्भात त्या त्या स्तरावर चर्चा होत होती. परंतु, ज्या दिवशी राणे समिती नेमली त्या दिवशी त्यांचे अस्तित्व संपुष्टात आले आणि खऱ्या अर्थाने त्याचा आढावा घेणे, त्यांना संरक्षण देणे आणि ज्या गोष्टी दुर्दैवी असतात, अप्रिय असतात, भ्रष्टाचाराचे विषय असतात ते लेखणीच्या माध्यमातून राज्याला सांगत असतात. या संदर्भात राणे समितीचा अहवाल आलेला आहे. दिनांक 04.07.2011 रोजी राणे समिती स्थापन झाली. सन 2013 मध्ये हा अहवाल सरकारला सादर झाला आणि मुख्य सचिवांच्या माध्यमातून तो कॅबिनेट समोर देखील आला होता. परंतु, दुर्दैवाने त्यावर काहीही चर्चा होऊ शकली नाही, त्याचे कायद्यात रूपांतर होऊ शकले नाही, ड्राफ्ट तयार होऊ शकला नाही आणि आजतागायत राणे समितीचा अहवाल प्रलंबित आहे. मुख्यमंत्री महोदयांनी देखील या संदर्भात दोन-तीन वेळा बैठका घेतल्या. जो खून झाला, त्या संदर्भात देखील बैठक घेतली आणि काल देखील विविध पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर विधिमंडळाच्या समिती कक्षात बैठक घेतली. मी सभागृहाला आश्वासित करतो की, पत्रकारांवरील हल्ल्याच्या संदर्भात शासन गंभीर आहे, शासन याकडे गांभीर्यपूर्वक पाहते. पोलीस महासंचालकांनी दिनांक 28 फेब्रुवारी, 2011 रोजी एक परिपत्रक जाहीर केले होते. त्या परिपत्रकाचा आढावा घेणे आणि पत्रकारांना संरक्षण देण्याच्या संदर्भात राज्याच्या पोलीस महासंचालकांना पुन्हा एकदा सूचना देण्यात येतील. पत्रकार हल्ला विरोधी कायद्याच्या संदर्भात राणे समितीचा जो अहवाल आलेला आहे, तो अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या प्रश्नामध्येच सांगितले की, हा कायदा करीत असताना तो राज्याच्या सूचित येतो, का केंद्राच्या सूचित येतो आणि तो राज्याच्या का केंद्राच्या सूचित येतो याची स्क्रुटीनी करून जे जे आवश्यक असेल ते करण्याच्या

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे..........

संदर्भात राज्य शासन पाठपुरावा करेल आणि निश्चित स्वरुपात कायदा करण्याच्या संदर्भात लवकरात लवकर जी उचित कारवाई करण्याची गरज आहे, आवश्यकता आहे.....

( विरोधी पक्षाने अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, पत्रकार संरक्षण कायद्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी वारंवार उल्लेख केला की, माननीय श्री.नारायण राणे साहेबांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली होती. त्यांनी राणे समितीच्या अहवालावर बरेच भाष्य केले. परंतु, ज्यावेळी सरकार सत्तेवर आले आणि माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी पहिली पत्रकार परिषद घेतली त्यावेळी त्यांनी सर्व पत्रकारांसमोर इतर कोणत्याही घोषणा न करता फक्त दोनच घोषणा केल्या होत्या. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, मी सर्वात प्रथम लोकसेवा विधेयक आणि पत्रकारांचा संरक्षण कायदा आणल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही निवडणुकीनंतर सत्तेवर आला आणि पहिल्याच पत्रकार परीषदेत दोन कायदे आणण्याच्या संदर्भात उल्लेख केला. त्यानंतर राज्य शासनाने मागील अधिवेशनात आणि याही अधिवेशनात अनेक कायदे मंजूर केले. परंतु, पत्रकारांच्या संरक्षणाच्या संदर्भात जो कायदा आहे त्या संदर्भात आम्ही अभ्यास करीत आहोत, केंद्राकडे कोणते अधिकार आहेत, राज्याकडे कोणते अधिकार आहेत, आम्हाला कशा पद्धतीने कायदा आणता येईल ? मागील 6 महिन्यात पत्रकारांवरील हल्ल्याच्या 47 घटना घडलेल्या आहेत. महिला पत्रकारांवर अन्याय झालेला आहे. संपूर्ण राज्यातून अशा प्रकारच्या तक्रारी येत आहेत. म्हणून पत्रकारांचा संरक्षण कायदा तुम्ही सभागृहात केव्हा आणणार आहात, हे आपण स्पष्टपणे सांगावे. तुम्हाला इतर कायदे करण्यासाठी वेळ लागत नाही आणि पत्रकारांच्या संदर्भातील कायदा करण्यासाठी वेळ लागतो ? हे कोठे तरी लपविण्याचा प्रयत्न किंवा असा कायदा करायचाच नाही, असे तुम्ही मनात ठामपणे बांधले आहे. त्यामुळे अशा प्रकारची उत्तरे दिली जातात. म्हणून हा कायदा केव्हा पर्यंत, कोणत्या तारखेपर्यंत सभागृहासमोर आणला जाईल ?

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायदा करणार काय असा प्रश्न विचारला व त्यासाठी राणे समितीचा संदर्भ देखील दिला आहे. त्यांनी असा संदर्भ दिला की, हे सरकार स्थापन झाल्यावर दोन घोषणा केल्या.(अडथळा...) माझ्या मनात काय आहे, हे तुम्हाला कसे काय कळले आहे, तुमच्या प्रश्नाला उत्तर आले नाही तर आपण पुन्हा प्रश्न विचारा. तुमच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी मी उभा आहे, मी प्रश्न डायव्हर्ड करीत नाही. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाचे उत्तर ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्यांनी दोन मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या मुद्दयांच्या संदर्भ घेऊन उत्तर देण्याचा मी जरूर प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल असे उत्तर देण्याचा मी प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न डेव्हलप करुन विचारला आहे, त्यामुळे त्या प्रश्नाला सविस्तर उत्तर देणे व प्रश्नाला न्याय देणे हे माझे कर्तव्य आहे. हे सरकार स्थापन झाल्यानंतर दोन प्रश्न उपस्थित करण्यात आले आहे, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, लोकसेवा हमी कायदा राज्य सरकारने सहा महिन्याच्या आता मंजूर केला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या सदनात सरकारने कोणते कायदे आणले व पास केले हा या लक्षवेधी सूचनेचा विषय नाही. अतिशय गंभीर विषयावर ही लक्षवेधी सूचना विचारण्यात आली आहे. मंत्री महोदयांकडून आम्हाला एवढीच अपेक्षा आहे की, सरकार पत्रकारांच्या संरक्षणासाठी किती दिवसात कायदा करणार आहे. त्याचप्रमाणे कायदा करण्यात येणार आहे की, कौन्सिल करणार आहे, हा एक महत्वाचा प्रश्न आहे, तेवढ्यापुरते उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, आमची देखील तीच भावना आहे की, यातून कोणाचीही सूटका होऊ नये. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केला (अडथळा....)

**तालिका सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी शांतता पाळावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यावर मंत्री महोदयांकडून उत्तर घेणे व मंत्री महोदयांनी उत्तर देणे अपेक्षित आहे. या सदनातील एकमेव ज्येष्ठ सदस्य, पक्ष प्रमुख असलेले आदरणीय श्री.माणिकराव ठाकरे यांना अशी सवय लागली आहे की, कोणीही वक्ता बोलण्यासाठी उभा राहिला की, हे उठतात व मध्ये बोलतात, मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घेत नाहीत. (अडथळा...) तुम्ही मंत्री महोदयांना उत्तर देऊ देत नसाल तर हे योग्य नाही.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

मंत्री महोदय दोन शब्द बोलले की, हे उठून उभे राहतात.(अडथळा...) सन्माननीय सदस्यांना या लक्षवेधी सूचनेवर उत्तर नको काय ? विरोधी पक्ष नेत्यांनी हरकत घेतली होती. पंरतु हे सन्माननीय सदस्य हरकत देखील घेत नाहीत, जागेवर उभे राहतात व मध्ये बोलतात, त्यांनी असे करु नये. आपण आपले ज्येष्ठत्व सांभाळावे. मंत्री महोदयांचे उत्तर आपण ऐकून घ्यावे.

**तालिका सभापती** : या लक्षवेधी सूचनेचा विषय अतिशय महत्वाचा आहे, सर्व सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे, खाली बसून बोलू नका. मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. पत्रकारांच्या संरक्षणाचा कायदा सभागृहात पारित केला पहिजे. यासंदर्भात काल नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, या विषयावर लक्षवेधी सूचना दिलेली आहे, त्यावेळी या विषयाच्या अनुषंगाने आपण प्रश्न विचारावेत. त्यामुळे मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, पत्रकारांच्या संरक्षणासाठी केव्हा कायदा करणार या प्रश्नाचे मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे. मंत्री महोदयांना उत्तर देता येत नसेल तर सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे. राज्यमंत्री महोदयांनी मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन उत्तर द्यावे. (अडथळा...)

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीच सदस्य श्री.संजय दत्त व सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. मी अजून प्रश्नाच्या उत्तराला टच देखील केला नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी दोन प्रश्न विचारले होते. पहिला प्रश्नाच्या बाबतीत लोकसेवा हमी कायदा या शासनाने मंजूर केला आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, पत्रकारांच्या संरक्षणाचा कायदा कधी करणार आहात. याबाबत मी सांगू इच्छितो की, जो कायदा करावयाचा आहे, त्यासाठी ऑथेरिटी व रेग्युलेटरी कौन्सिल आहे. या कायद्याची अंमलबजावणी चांगल्या पध्दतीने व्हावी यासाठी जे करण्याची आवश्यकता ते केले जात आहे. कायद्याच्या संदर्भात केंद्र व राज्य सूची वेगळी आहे, या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी भविष्यकाळात झाली पाहिजे. जसे आपणाला वाटते तसे आम्हाला देखील वाटते. हा कायदा करताना कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी सखोल अभ्यास करुन कायदा करण्याची गरज आहे. राणे समितीमध्ये पाच

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे...

मंत्री होते, त्यांनी हा अहवाल सादर केलेला आहे. हा कायदा त्या कालखंडात अस्तित्वात आला नाही. या कायद्याचे प्रारुप देखील मागील सरकारने तयार केले नाही. इंडियन मेडिकल कौन्सिल व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल असते या दोन वेगवेगळ्या गोष्टी (अडथळा...) आपण असे म्हणू नका, आपण पत्रकारांच्या विरोधात आहात काय ? कायदा आणता येणार नाही असे मी म्हटलेले नाही. आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे आपण ज्येष्ठ नेते आहात. विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या दालनात बैठक घेतली आहे, मी आता सभागृहाला आश्वासित करतो की, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्ष नेते व गट नेते यांना एकत्रित बोलवून त्यांच्याशी चर्चा करुन प्रत्रकावरील हल्ला विरोधी कायद्याचे प्रारुप (अडथळा....) सभापती महोदय, मी उत्तर फायनल करतो.

**तालिका सभापती** : मंत्री महोदय, आपण थोडे थांबावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांच्या उत्तराला हरकत आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अजून उत्तर पूर्ण केलेली नाही त्यामुळे आपण हरकत कशी काय घेत आहात, उत्तर पूर्ण झाल्यावर आपण हरकत घ्यावी.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी काय हरकत आहे ती ऐकून घ्यावी, माझी काय हरकत आहे ती ऐकल्याशिवाय आपणाला कळणार नाही. राणे समितीचा वारंवार उल्लेख करुन सरकार पळ काढत आहे. केंद्र शासनाने व राज्य शासनाने भरपूर अध्यादेश काढले आहेत, या कायद्याबाबत राज्य शासन अध्यादेश का काढत नाही. अध्यादेश काढण्याबाबत आपणाला कोणी अडविले आहे काय ? कायदा जेव्हा होईल तेव्हा होईल, केंद्र व राज्य शासनाने अध्यादेश काढावा. राणे समितीचा संदर्भ देऊन आपण पळ काढू नका. कोणत्याही समितीचा अहवाल सरकारवर बंधनकारक नसतो, तो आपण रुल आऊट करा. सरकारने कायद्याचे प्रारुप आणावे, अशी माझी हरकत आहे. राणे समितीचा संदर्भ देऊन पळ काढू नका. या कायद्याबाबत सरकार अध्यादेश काढणार काय ? केंद्र सरकारकडे राज्य शासन बोट दाखवित आहे, केंद्र शासनाने आतापर्यंत 13 अध्यादेश काढले आहेत व सरकार कारभार करीत आहेत. केंद्र व राज्य शासन या कायद्याबाबत अध्यादेश काढणार आहे काय ?

या नंतर श्री.भोगले....

प्रा.राम शिंदे : मी पळ काढण्यासाठी कोणताही रेफरन्स दिलेला नाही. मी आपली हरकत ऐकून घेतली आहे. राणे समिती सरकारने नेमली होती, पाच मंत्री त्या समितीचे सदस्य होते. समितीचा अहवाल प्राप्त झाला, परंतु कायदा अस्तित्वात येऊ शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. जो अहवाल आला तो सरकारने रिजेक्ट केला किंवा नाही केला यामध्ये मी जाऊ इच्छित नाही. परंतु कायदा करणे आवश्यक होते. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात सर्व पत्रकारांच्या संघटनांना एकत्रित बोलावून बैठक घेतली. मी सभागृहाला आश्वासित करतो की, सर्व पक्षाचे गटनेते, विरोधी पक्षनेते यांना सोबत घेऊन एक महिन्याच्या आत कायद्याचे प्रारूप तयार करण्यासाठी पुन्हा एकदा बैठक बोलावण्यात येईल. अतिशय प्रभावी कायदा आणण्याच्या दृष्टीने हे सरकार वचनबध्द व कटिबध्द आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, एक महिन्याच्या आत प्रारुप आणणार आहोत, त्याबद्दल मी सरकारचे स्वागत करतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, हा एक किंवा दोन व्यक्तींच्या जीवन मरणाचा प्रश्न नसून पूर्ण समुहाच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. उत्तर देताना या कायद्यासाठी 2011-12 पासून काय झाले हे सांगण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्या काळात विरोधी पक्षात असलेले माननीय सदस्य आज सत्ताधारी पक्षात बसलेले आहेत. त्यांनी त्या काळात पत्रकारांसाठी छाती फुगवली होती. आज चिलखत चढवून का बसले आहेत? पत्रकारांवरील हल्ल्यांची संख्या 187 इतकी असताना सरकार म्हणते फक्त 77 घटना घडल्या आहेत. गृह खात्याचे अभिनंदन केले पाहिजे का, राष्ट्रपती पदक दिले पाहिजे का?

सभापती महोदय, जे. डे नावाच्या पत्रकाराचा खून झाला, त्या प्रकरणाचे पुढे काय झाले? अरुणा शानबाग या 47 वर्षे अंथरुणाला खिळून होत्या, त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी शोधून काढले नाही. शोध पत्रकारितेचा भाग म्हणून एका पत्रकाराने त्या गुन्हेगाराचा छडा लावला. असे अनेक पत्रकार कार्यरत आहेत. दूरदर्शन वाहिन्यांवर विदेशी पत्रकारांचे अपहरण केल्याच्या व त्यांची हत्या केल्याबद्दलच्या व्हिडिओ क्लिप सुध्दा दाखविल्या जातात. 187 पत्रकारांना मारल्यानंतर शासन म्हणते की कायदा करणार आहोत, मार्ग काढणार आहोत. यापुढे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

समाजामध्ये कोणत्याही बातम्या द्यायच्या नाहीत असे पत्रकारांनी ठरविले तर तुम्हा आम्हाला घरात बसून काही बघता येणार नाही, वृत्तपत्रातून बातम्या वाचता येणार नाहीत. अशा समुहाच्या

....2...



श्री.किरण पावसकर....

संरक्षणाकरिता सक्षम कायदा करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे का? निवेदनात पत्रकार हल्ला प्रतिबंधक समितीचा उल्लेख केला आहे. अशा समित्या काय कामाच्या आहेत? मोहल्ला समित्यांचे जे परिणाम दिसून येत आहेत तसेच या समित्यांचे होणार आहे. अशा समित्यांना ग्राहक मंचासारखे वैधानिक अधिकार देणार आहात का, तसे करणार नसाल तर सक्षम कायदा कसा होणार?

सभापती महोदय, जातीवाचक शब्द उच्चारल्यानंतर ॲट्रॉसिटी ॲक्ट लावला जातो, ताबडतोब संबंधितांना अटक केली जाते. पत्रकारांसाठी अशा प्रकारचा ॲक्ट तुम्ही आणू शकता. लोकप्रतिनिधी अनेकदा मोर्चे काढतात, आम्ही मोर्चामध्ये पुढे असतो. परंतु त्याच्याही पुढे जाऊन पत्रकार उभे असतात. ते आमचे फोटो काढण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांना संरक्षण देण्यासाठी सक्षम कायदा करणार आहात काय, अभ्यास करण्यासाठी आणखी किती पत्रकारांना बलिदान करावे लागणार आहे? सरकारने आरटीआय कायदा आणला. आरटीआय कार्यकर्त्यांना मारले गेले. पत्रकारांप्रमाणेच आरटीआय कार्यकर्ते सुध्दा काम करीत असतात. भ्रष्टाचार शोधून काढतात. ते चिरडले जातील, मारले जातील असे होऊ नये म्हणून सक्षम प्रतिबंधक कायदा आणण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय? ॲट्रॉसिटी ॲक्ट केला तशा पध्दतीने हा कायदा करणार आहात काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मी अतिशय पर्टिक्युलर उत्तर दिलेले आहे. विरोधी पक्षनेत्यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती, त्याबाबत जे मुद्दे उपस्थित केले त्याला मी उत्तर दिले आहे. पत्रकारांवर हल्ले होणार नाहीत या दृष्टीकोनातून आपल्या सर्वांना विचारात घेऊन अभ्यासपूर्वक कडक कायदा करण्यासाठी एका महिन्याच्या आत प्रारुप आणण्याची मी घोषणा केली आहे. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांच्या प्रश्नाचा त्यामध्ये अंतर्भाव आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आज पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवडयातील कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. अधिवेशनाचा आणखी एक आठवडा शिल्लक आहे. अध्यादेश काढण्यापेक्षा आजच किंवा मंगळवारी बैठक घ्यावी आणि अधिवेशन संपण्याच्या दोन दिवस अगोदर हा कायदा सभागृहापुढे आणण्यात यावा. सरकार हे करु शकते. पण

...3....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.....

सरकारची इच्छाशक्ती नाही. ओ.बी.व्हॅनची तोडफोड केली जाते. तुमच्या विरोधात कोणी लिहिले तर घरात घुसून हल्ला करण्याचे प्रकार घडतात. मध्यप्रदेशातील बालाघाट येथे पत्रकाराला जिवंत जाळून टाकल्याची घटना घडली आहे. त्यामुळे सर्व कामकाज बाजूला ठेवून आज दुपारी बैठक घेण्यात येऊन पुढील आठवड्यात कायदा सभागृहापुढे आणण्यात येईल काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी सभागृहाला आश्वासित केले आहे. ही लक्षवेधी सूचनेवरील चर्चा असून स्थगन प्रस्तावावरील चर्चा नाही. लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मी अतिशय जबाबदारीने आणि योग्य पध्दतीने उत्तर दिलेले आहे. एका महिन्यात कायद्याचे प्रारुप आणू असे सांगितले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी सरकारचे यासाठी अभिनंदन करते की, मंत्री महोदयांनी एका महिन्याच्या आत प्रारुप ठरविण्यासाठी बैठक आयोजित करण्याचे सांगितले आहे.

(अनेक माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी अनुमती मागण्याचा प्रयत्न करीत असतात)

**उप सभापती** : अजूनही पाच ते सहा सदस्यांना या लक्षवेधी सूचनेसंबंधी प्रश्न विचारावयाचे आहेत. म्हणजे याच लक्षवेधी सूचनेवरील चर्चेसाठी आणखी एक तासाचा वेळ लागण्याची शक्यता आहे. या लक्षवेधी सूचनेवर अधिक प्रश्न विचारण्यापेक्षा माननीय सदस्यांनी या विषयाबाबत अर्धातास चर्चा उपस्थित करावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, राजेंद्र दुबे या पत्रकाराचा खून झाला. शशी शर्मा, संतोष मिश्रा, अनिल नौटियाल या पत्रकारांवरील हल्ल्याच्या अनुषंगाने वैद्यकीय खर्च सरकारने उचलला आहे का? दुसऱ्या एका प्रकरणात मनश्री पाठक या पत्रकारावर हल्ला झाला. गेल्या वर्षात अनेक पत्रकारांवर हल्ले झाले. ती प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याचा विचार करणार

आहात काय? मला या विषयामध्ये राजकारण आणायचे नाही. राणे समितीने अशा प्रकारच्या हल्ल्यांबाबत नकारात्मक भूमिका का घेतली होती हे सारांशाने आम्हाला कळेल काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की, निश्चित स्वरुपात कायदा आणण्यासाठी शासनाने समिती नेमूनही कायदा अस्तित्वात आला नाही. म्हणून त्या बैठकीमध्ये सर्वंकष चर्चा होईल, प्रारुप तयार करताना सर्व मुद्दे विचारात घेता येतील. राजेंद्र दुबे या पत्रकारावरील हल्ल्याच्या संदर्भातील खटला जरुर फास्ट

...4...

24-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F.4

SGB/ AKN/ KTG/ AKN/ ST/ 10:50

प्रा.राम शिंदे....

ट्रॅक कोर्टामध्ये चालविला जाईल. इतर तीन पत्रकारांवर हल्ले झाले त्या संदर्भात सुध्दा सरकारच्या माध्यमातून काय मदत दिली, त्या संदर्भात सकारात्मक दृष्टीकोनातून सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा प्रश्न खूप गंभीर आहे. पत्रकारांवर हल्ले होतात, पत्रकारांचा खून होतो. शासनाने उत्तरामध्ये म्हटले आहे की, फक्त पत्रकारांवरील हल्ल्याच्या 77 घटना घडल्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केला की, पत्रकारांवर हल्ले होतात, पण गुन्हेगारांना अटक होत नाही, त्यांच्याविरुध्द चार्जशीट दाखल होत नाही आणि गुन्हे अजिबात उघडकीस येत नाहीत. पत्रकारांवर 77 हल्ले झाल्याचे सरकारने मान्य केले आहे. या घटनांबाबतचा कन्व्हिक्शन रेट काय आहे?

नंतर जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त...

प्रारुप एक महिन्याच्या आत तयार करण्यात येणार आहे. मला एक शंका आहे. आपण फार लाईट ॲक्ट तयार केला तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. पत्रकारांवर होणारा हल्ला कॉग्नीझेबल ऑफेन्स, नॉन बेलेबल ऑफेन्स करावा अशी त्यांची मागणी आहे. लॉ टु प्रीव्हेंट अटॅक ऑन डॉक्टर्स असा आपण डॉक्टरांच्यासंबंधात कायदा केला आहे. त्याप्रमाणे पत्रकारांसाठी कायदा आपण करणार आहात काय, असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. माझा तिसरा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की,...

**उप सभापती :** एकच प्रश्न विचारणार आहे आपण असे म्हणाला होता.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा शेवटचा प्रश्न आहे. पत्रकार आमचे रिपोर्टींग करतात. पण पत्रकारांच्या प्रॉब्लेमची कधीच चर्चा होत नाही. आपण पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी कायदा तर आणलाच पाहिजे. पत्रकारांना पेन्शन लागू करण्यासंबंधातील मागणी देखील करण्यात आलेली आहे. पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यातील पत्रकारांना पेन्शन योजना लागू करण्यात आलेली आहे. तेव्हा माझ्या या तीन प्रश्नाबाबत सरकार विचार करणार आहे काय ?

**उप सभापती :** माननीय मंत्र्यांनी तिन्ही प्रश्नाला एकत्रितपणे उत्तर द्यावे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, 77 अभिलेख्यावरील जे गुन्हे दाखल आहेत त्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यास मी उत्तर दिलेले आहे. कन्व्हीक्शन रेटच्या संबंधी आपली जी भावना.... सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मागणी केली की, हा कायदा व्यवस्थित नाही. कन्व्हीक्शन होत नाही..... (अडथळा)...... आपण माझे उत्तर तर ऐकून घ्यावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी कन्व्हीक्शन रेटचा आकडा सांगितला पाहिजे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी कन्व्हीक्शन रेटसंबंधीच सांगत आहे. सध्या असलेल्या कायद्याच्या अधीन राहून कन्व्हीक्शन होणे अपेक्षित आहे. पण ते होत नाही म्हणून नवीन कायदा आपण आणत आहोत. 77 गुन्ह्यांच्या संदर्भातील कन्व्हीक्शन पटलावर ठेवण्यात येईल.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे माननीय मंत्री उत्तर देत असताना त्यांना सारखे डिस्टर्ब करीत असल्यामुळे मी आपल्या प्रश्नावरील उत्तर थांबवित आहे

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, यातून सरकार या प्रश्नावर गंभीर नाही असे दिसते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मी अगदी थोडक्यात एक प्रश्न माननीय गृह राज्यमंत्र्यांना विचारू इच्छितो. आपण पत्रकारांसंबंधातील कायदा करणार आहात. त्यासंबंधी आपला हेतू स्पष्ट आहे असे आपण सांगितले आहे. गृह खाते, विधि व न्याय विभाग, त्याच बरोबर अन्या खात्यांशी एकत्रित चर्चा करून हा कायदा आपल्याला बनवायचा आहे. त्यानंतर आपण सर्वात शेवटी ॲडव्होकेट जनरल यांचे मत विचारात घेणार आहात. आज या राज्यात कायमस्वरूपी ॲडव्होकेट जनरल नाही. त्यामुळे आम्ही ॲडव्होकेट जनरलचे मत घेऊ आणि त्यानंतर या कायद्याबद्दल विचार करू अशी आपली पुढची सबब राहणार आहे. आता जे ॲडव्होकेट जनरल आहेत त्यांच्याकडे त्या पदाचा कार्यभार आहे. माझी शासनाला विनंती आहे की, ही एक्सक्यूज आपण ठेवू नये. ज्यांच्याकडे कार्यभार आहे त्यांच्या मताला अनुसरून आपण कायदा करावा. या गंभीर विषयावर कायदा होण्याची फार तातडी आहे. त्यामुळे किती कालावधीमध्ये यातील सगळी प्रोसेस पूर्ण करून कायदा करणार आहात, याबद्दल आपण खुलासा करावा.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, ज्या सूचना केल्या आहेत त्या सर्व सूचनांचा समावेश करूनच कारवाई करण्यात येईल. मी सर्वांना बरोबर घेऊन एक महिन्याच्या आत बैठक घेऊन प्रारूप तयार करण्यात येईल.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, पत्रकारांना संरक्षण देणाऱ्या कायद्याच्याबाबतीत सन्माननीय मंत्र्यांनी येथे उत्तर दिलेले आहे. त्यांनी एक महिन्याच्या आत कायद्याचे प्रारूप बनविण्याचा शब्द या सभागृहाला दिलेला आहे. दोन्ही सदनातील दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांना, नेत्यांना, गट नेत्यांना व विरोधी पक्ष नेत्यांना कायद्याचे प्रारूप बनवित असताना सोबत घेऊ असा देखील शब्द दिलेला आहे. या लक्षवेधी सूचनेला न्याय दिल्याबद्दल मी माननीय मंत्र्यांचे स्वागत करतो. कायद्याचे प्रारूप तयार झाल्यानंतर लगेचच अध्यादेश काढावा आणि हिवाळी अधिवेशनामध्ये अध्यादेशाचे कायद्यामध्ये रूपांतर करावे अशी देखील मी विनंती करतो.

====

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : वर्धा जिल्हा धनगर सेवा समाज मंडळ यांनी अहिल्यादेवी स्मारकाकरिता जागा उपलब्ध करून देण्याची केलेली मागणी

**मु.शी.** : वर्धा जिल्हा धनगर सेवा समाज मंडळ यांनी अहिल्यादेवी स्मारकाकरिता जागा उपलब्ध करून देण्याची केलेली मागणी यासंबंधी सर्वश्री अनिल सोले,मितेश भांगडिया,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"वर्धा शहरात "वर्धा जिल्हा धनगर सेवा समाज मंडळ" कार्यरत असून या संस्थेचे कार्यालय वंजारी चौक, वर्धा येथे आहे. सदर मंडळाने वर्धा नगर परिषदेच्या मालकीची असलेली जागा अहिल्यादेवी स्मारकाकरिता मागणी केली असता यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, १९७८ रोजी वर्धा नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र ५ नुसार वंजारी चौक, वर्धा येथील ३ हजार चौ. फूट जागा देण्यास मंजूरी देणे, या जागेवर सदर संस्थेने नियमानुसार परवानगी घेवून स्मारकाचे बांधकाम करणे, सदर बांधकामाकरिता नगरविकास विभाग व नगर परिषद यांनी निधी उपलब्ध करुन देणे, त्यानंतर धनगर समाज सेवा मंडळाने ही जागा नियमित स्वरुपात सुपुर्द करुन देण्याबाबत नगर परिषद, वर्धा यांना विनंती करणे, नगर परिषद प्रशासनाने सदर प्रस्ताव मंजुरीस्तव नगरविकास विभाग यांना दिनांक ६ डिसेंबर, २०१२ रोजी सादर करणे, परंतु अजूनपर्यंत सदर प्रस्तावास मंजूरी देण्यास संबंधित विभाग दुर्लक्ष करित असल्याचे दिसून येत असल्याने धनगर समाजातील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होणे, सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देवून धनगर समाजातील मंडळास जागा हस्तांतरित करण्याची प्रक्रिया शासनाने तातडीने करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका."***

..5

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल सोले : सभापती महोदय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारकासाठी जागा देण्याचा प्रस्ताव हा अत्यंत जुना आहे. दिनांक 23 नोव्हेंबर 1978 रोजी वर्धा नगर परिषदेने जागा देण्यासंबंधीचा ठराव मंजूर केला आहे. त्यानंतर सन 2008 साली जागा देऊन तेथे स्मारकाची निर्मिती करण्यात आली आहे. वर्धा जिल्हा धनगर सेवा समाज मंडळाने 3.7.2012 रोजी ही जागा हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला. शासनाकडून माझ्या लक्षवेधी सूचनेला आज जे लेखी उत्तर देण्यात आले आहे त्यात म्हटले आहे की, "सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिकची माहिती मागविण्यात आली असून सदर स्मारक वर्धा जिल्हा धनगर समाजसेवा मंडळ, वर्धा यांना हस्तांरित करण्याबाबत महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 व महाराष्ट्र नगर परिषद (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम 1983 मधील तरतुदीनुसार तपासून योग्य तो निर्णय त्वरित घेण्यात येईल." माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, सन 2012 पासून नगर परिषद ते नगर विकास विभाग आणि पुन्हा नगर परिषद असा पत्रव्यवहार सुरू आहे. हा जो प्रवास आहे तो थांबला पाहिजे. माननीय मंत्र्यांनी यावर ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे आणि ही जागा वर्धा जिल्हा धनगर सेवा मंडळाकडे ताबडतोब हस्तांरित केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. त्या दृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. तसेच किती दिवसांमध्ये हस्तांतरित करण्यात येणार आहे हे देखील सभागृहाला अवगत करण्यात यावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, वर्धा जिल्हा धनगर सेवा समाज मंडळाने तेथे जी वास्तू आहे ती रितसर हस्तांतरित करण्यात यावी अशा प्रकारची मागणी केली आहे. सन 2009 ते 2012 पर्यंतची सर्व माहिती घेतली असता असे लक्षात आले की, सन 2009 साली नगर परिषदेने ठराव केला होता. यासंबंधी आपण 37 (1) नुसार कारवाई केलेली आहे. पुढे वैशिष्ट्यपूर्ण निधीतून शासनाने निधी देखील उपलब्ध करून दिलेला आहे. पण ही स्थावर मालमत्ता शासनाची आहे हे लक्षात आल्यानंतर नगर परिषदेकडे मागणी करण्यात आली की, तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. आता ही जागा नझुलची आहे. टायटल क्लिअर नाही. त्यामुळे यासाठी जी काही प्रक्रिया लागेल ती माझ्या स्तरावर मी स्वत: पुढाकार घेऊन दोन महिन्याच्या आत ही जागा व स्थावर मालमत्ता वर्धा जिल्हा धनगर सेवा समाज मंडळाच्या नावावर करण्यात येईल एवढे मी सांगतो.

श्री.अनिल सोले : धन्यवाद.

........ ... 7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मौजे खिडकाळी,ता.जि.ठाणे येथील भूखंड विकसित करून गृहप्रकल्प उभारण्याबाबत

**मु.शी.** : मौजे खिडकाळी,ता.जि.ठाणे येथील भूखंड विकसित करून गृहप्रकल्प उभारण्याबाबत ॲड.निरंजन डावखरे,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे खिडकाळी, ता.जि.ठाणे येथील सर्व्हे नंबर 155/1A, 155/4A/1, स.क्र. 156/1 157/1/अ व 157/2 आणि 162/1 वरील भूखंड विकसित करुन तेथे गृहप्रकल्प उभारण्याबाबत संबंधित विकासकांना ठाणे महानगरपालिकेकडून दिनांक 31 ऑगस्ट, 2013 रोजी वा त्यादरम्यान विहित अटी व शर्तीवर परवानगी देण्यात येणे, त्यानुसार सदर विकासकांकडून पूर्तता करण्यात येणे, तसेच महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, 1966 यातील कलम 42 अ मधील (अ) तरतुदीमध्ये, तयार करण्यात आलेल्या व प्रसिध्द केलेल्या मंजूर विकास योजनेत किंवा प्रारुप विकास योजनेत निश्चित केल्याप्रमाणे कोणत्याही प्रयोजनाकरिता भोगवटादार वर्ग-1 मधून धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या वापराचे रुपांतर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या कोणत्याही पूर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही" तथापि, नियोजन प्राधिकरण, जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा आणि त्यावरील भार, कोणताही असल्यास, याची संबंधित महसुली प्राधिकाऱ्यांकडून विनिश्चित करील आणि त्याबाबतची विनिश्चिती केल्यांनतर, ते महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 याच्या तरतुदींनुसार विकासाची परवानगी देईल, असे नमूद करण्यात येणे, तथापि

..8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***ॲड.निरंजन डावखरे...***

यापूर्वी 7/12 च्या उताऱ्यावर भोगवटादार वर्ग-1 करिता जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगी घेण्याची आवश्यकता नसणे, तसेच सदर प्रकल्पाबाबतची माहिती एक महिन्याच्या आत तहसिलदारांना सादर करण्याचे बंधन असणे, हे लक्षात घेता, ठाणे महानगरपालिकेकडून संबंधित विकासकांना जिल्हाधिकाऱ्यांकडून परवानगी मिळाल्याशिवाय पुढील कार्यवाही करण्याची जाणिवपूर्वक टाळाटाळ करण्यात येणे, परिणामी कायद्याअंतर्गत तरतुदींचे उल्लंघन करण्यात येणे, यामुळे एकीकडे गृहप्रकल्पाची विकासकामे ठप्प झाल्यामुळे महानगरपालिकेस कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नास वंचित रहावे लागणे, गृहप्रकल्प वित्तीय संस्थांकडून कर्जे घेऊन राबवित असल्यामुळे संबंधित विकासकांनी ठाणे महानगरपालिकेच्या आडमुठ्या धोरणाविरुध्द राज्यमंत्री (नगरविकास), यांचेकडे अनेकदा निवेदने देऊनही अद्याप कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील सर्व विकासकांमध्ये व गृहप्रकल्प योजनेच्या सभासदांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याबाबत शासनाने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन विकासकांना गृहप्रकल्पाची पुढील कामे सुरु करण्याचे आदेश देण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, दिनांक 22 ऑगस्ट रोजी जो जी.आर.काढला आहे, त्याचा आधार घेऊन वेगळा अर्थ काढण्यात आला आहे. महानगरपालिकेमध्ये नवीन डेव्हलपमेंट प्लॅन सादर करतो तेव्हा महानगरपालिकेकडून मंजूर करून घेण्यात येतो. सदर जमीन ही वर्ग-1ची असल्याकारणामुळे डेव्हलपेमेंट प्लॅन अडविण्यात आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे आज डेव्हलपमेंट टॅक्स गोळा होत नाही. 22 ऑगस्ट पासून एकही डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर होत नाही. आता एलबीटी बंद होणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेला त्रास होत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे ......

त्यामुळे त्रास होतो. महानगरपालिका पाण्याचा टॅक्स वाढविण्याच्या विचाराधीन असून महानगरपालिकेला प्रॉपर्टी टॅक्स सुध्दा वाढवावा लागेल. या टॅक्सचा भार हळू हळू सामान्य नागरिकांवर येत आहे. त्यामुळे डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर करुन महानगरपालिकेने डेव्हलपमेंट टॅक्स वसूल केला तर महानगरपालिकेवरील आर्थिक बोजा कमी येईल. ओ.सी.पर्यंत जमीन मालकाने किंवा विकासकामे विनिश्चिती करुन घ्यावी, अशा प्रकारचा निर्णय मंत्री महोदय घेतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, दि.22 ऑगस्ट, 2014 रोजी आपण महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोड, 1966 मध्ये सुधारणा केली असून कलम 42 (अ) (1) (अ) प्रमाणे महापालिका किंवा नियोजन प्राधिकरण यांच्याकडे जमिनीच्या विकासाबाबत अर्ज केल्यानंतर सक्षम महसूल प्राधिकरणाकडून भोगवटा, वर्ग आणि भार या संदर्भातील विनिश्चिती करुन घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. जमीन वर्ग-1 या सदराखालील असेल तर त्यासाठी विनिश्चिती केल्यानंतर पुन्हा नाहरकत प्रमाणपत्र घेण्याची गरज राहणार नाही. ही प्रक्रिया करण्यासाठी आपण एमआरटीपी ॲक्टमध्ये 60 दिवसांची मुदत दिलेली आहे. परंतु असे लक्षात आले आहे की, शहरी भागातील विकासक किंवा जमीन मालक मुखत्यार पत्राव्दारे किंवा अन्य विकासकांव्दारे जमिनींचा विकास करीत असल्यामुळे या प्रक्रियेस थोडासा विलंब होतो. तथापि, या प्रक्रियेस 60 दिवसांपेक्षा अधिक वेळ लागता कामा नये, या संदर्भातील सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या जातील.

सभापती महोदय, वर्ग-1 च्या जमिनींची अनेक प्रकरणे संदर्भासाठी प्राप्त होत असल्यामुळे महानगरपालिकेने असे प्रस्ताव दोन प्रतींमध्ये तयार करावेत व त्याची एक प्रत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावी. जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रकरणाची छाननी करीत असताना त्यांच्या अभिलेखावरुन काही त्रुटी निदर्शनास येत असेल तर ती महानगरपालिकेला विहित मुदतीत कळवावी, असे ठरविले पाहिजे. आता 60 दिवसांच्या आत ही प्रक्रिया पूर्ण करणे, हे कायद्यान्वये आपल्यावर बंधनकारक आहे.

सभापती महोदय, बांधकाम परवाना किंवा विकास परवान्यासंबंधीचा समावेश सेवा हमी कायद्यात असला पाहिजे. आता राज्य शासन सेवा हमी कायदा आणणार आहे. तथापि,

.....2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील..........

सद्य:स्थितीत विकासकांच्या प्रश्नांबाबत किंवा विकास करण्यामध्ये येणाऱ्या अडथळ्यांबाबत संबंधितांना सूचना आणि आदेश निर्गमित केले जातील. कोणत्याही विकासकाचे काम प्लिंथपर्यंत आल्यानंतर ओ.सी.पर्यंतची पुढील प्रक्रिया थांबू नये, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रमाणपत्रासाठी किंवा महानगरपालिकेच्या कागदपत्रांसाठी कोणतेही प्रकरण प्रलंबित राहू नये, या संदर्भातील सूचना संबंधितांना देण्यात येतील.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, कलमामध्ये फरक झालेला आहे. आपण कलम 42 (अ) 1 (अ) मध्ये फरक केलेला आहे, याची माहिती मंत्री महोदयांनी दिलेली आहे. परंतु या सर्व बाबी केवळ पेपरवरच आहेत. ठाणे महानगरपालिकेअंतर्गत येणारी अशी किती तरी प्रकरणे एक वर्षापासून प्रलंबित आहेत. 60 दिवसांच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या संदर्भात माझा असा स्पेसिफिक प्रश्न आहे की, ठाणे महानगरपालिका 350 कोटी रुपयांच्या विकास कराला मुकत असून तो प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु, विकासकामांच्या अनेक प्रकरणांचा निपटारा महानगरपालिकेकडून गेल्या एक वर्षापासून केला जात नाही. ही सर्व प्रलंबित प्रकरणे किती दिवसात निकाली काढण्यात येतील आणि जर ही प्रलंबित प्रकरणे निकाली काढली गेली नाही तर आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न वर्ग-1 जमिनींच्या संदर्भातील आहे. मी यापूर्वीच सांगितले आहे की, आपण सन 2014 मध्ये कायद्यात सुधारणा केली आहे. ......

वर्ग-1 च्या जमिनींवरील भोगवटा, जमिनीचा वर्ग आणि जमिनीवरील भार याची विनिश्चिती करावयाची आहे. आता एन.ओ.सी.साठी जिल्हाधिकाऱ्यांकडे जाण्याची गरज राहणार नाही. वर्ग 1 जमिनीबाबत जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही तशी स्पष्ट तरतूद नियमात असलेले नियोजन प्राधिकरणाने वर्ग 1 च्या जमिनीवरील विकास प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रथमतः विकास परवानगी देऊन तदनंतर सदर प्रकरण विनिश्चितीसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. परंतु भोगवटा, भार आणि वर्ग यासाठी आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रकरण जावे, त्यांनी विनिश्चिती करावी आणि प्रमाणपत्र द्यावे, असे अभिप्रेत आहे. कारण हा "Use of doing business" मधीलही हा भाग आहे. म्हणून आपण ते

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील.......

केले आहे. तथापि, जर वर्ग-1 च्या जमिनींच्या संदर्भातील प्रकरणे प्रलंबित असतील तर त्याबाबत शासन सकारात्मक विचार करील. अशी प्रकरणे कोणत्या कारणासाठी, किती कालावधीची प्रलंबित आहेत, या संदर्भात महानगरपालिकेकडे विचारणा केली जाईल आणि सर्व प्रकरणांचा आपण निपटारा करू.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, दोन दोन वर्षे प्रकरणे अडवून ठेवण्यात आली आहेत. परंतु, त्यांची माहिती घेण्यापेक्षा ही प्रकरणे 60 दिवसाच्या आत सॅंक्शन करण्याच्या संदर्भात आपण महानगरपालिकेला निर्देश देणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, यामध्ये अटी आणि शर्थींचा समावेश केलेला आहे. त्यामुळे भोगवटा, वर्ग आणि भार न पाहता मंजुरी कशी देता येईल ? नागरी क्षेत्रातील जमिनींचा विकास मुखत्यारपत्रव्दारे किंवा विकासकाव्दारे केला जातो. त्यामुळे या संदर्भातील प्रक्रिया थोडी गुंतागुंतीची असते. 60 दिवसात या गोष्टी करणे शक्य नाही. परंतु आपण म्हटल्याप्रमाणे महानगरपालिकेने तेवढ्यासाठी असे प्रश्न प्रलंबित न ठेवता भोगवटा, भार किंवा वर्ग या संदर्भात निश्चिती करुन एका ठराविक कालमर्यादेत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आपण निश्चित केले आहे.

सभापती महोदय, या लक्षवेधीमध्ये उल्लेख केलेल्या विकासकाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाला अगोदरच दोन वर्षे उलटून गेलेली आहेत. बांधकाम प्लिंथपर्यत झालेले आहे. भोगवटा प्रमाणपत्रापुर्वी अशी विनिश्चिती करुन घेणे विकासकावर बंधनकारक राहील. त्यासाठी शासनाकडून जे काही निर्देश लागतील ते ओसीपर्यंत आपण देऊन टाकू.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, अनेक गृहप्रकल्प वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन चालविले जातात. आपण सभागृहात जे काही आदेश देता त्या आदेशाचे प्रत्यक्ष पालन होत नाहीत. त्यामुळे तशा प्रकारचे आदेश आपण तातडीने देणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती मी अगोदरच विस्तृतपणे दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मर्यादित आहे. तशा प्रकारचे निर्देश दिल्यानंतर जी काही कमिटमेंट आहे त्याप्रमाणे केले जाईल.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिल्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, महानगरकपालिकेचा या सर्व विलंबामुळे जवळपास 350 कोटी रुपयांचा टॅक्स बुडतो आहे. महानगरपालिका डेव्हलपमेंट प्लॅन अडवणार नाही, ओसी पर्यंतची त्यांनी विनिश्चिती करुन आणावी आणि तेथपर्यंत डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर करावा, एवढीच विनंती मी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मंत्री महोदयांना करु इच्छितो.

डॉ.रणजित देशमुख : सभापती महोदय, या स्पेसिफिक प्रश्नाच्या संदर्भात मी अगोदरच विस्तृत माहिती दिलेली आहे. 350 कोटी रुपयांच्या महसुला संदर्भात निश्चितपणे विनिश्चिती करावीच लागणार आहे. विनिश्चितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आपण कालमर्यादा घातलेली आहे. त्यामुळे आपल्याला कोठेच थांबायची गरज नाही. आपण सगळया गोष्टीबाबत, सगळया प्रकरणात एक सारखे धोरण घेतलेले आहे.

----

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबईतील कांदिवली-चारकोप येथील कुंभारकला गृहनिर्माण संस्थेस दिलेलया चारकोप सर्व्हे क्र.41, सी.टी.एस.प्लॉट क्र 1 वर झालेले अतिक्रमण व तेथील घातक व्यवसाय

**मु.शी.** :मुंबईतील कांदिवली-चारकोप येथील कुंभारकला गृहनिर्माण संस्थेस दिलेलया चारकोप सर्व्हे क्र.41, सी.टी.एस.प्लॉट क्र 1 वर झालेले अतिक्रमण व तेथील घातक व्यवसाय यासंबंधी ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. ॲड.अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"***मुंबईतील कांदिवली चारकोप येथील कुंभारकला चारकोप सर्व्हे क्र. ४१ सीटीएस प्लॉट क्र. १ आरडीपी १ आठ ते नऊ एकरचा भूखंड समाजाच्या नियोजित कुंभारकला सहकार गृहनिर्माण संस्थेला १९७६ साली भाडेपट्टयावर वितरित करण्यात येणे, सदर भूखंड आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा कुंभार समाजाला प्रयोजनासाठी देण्यात आला होता त्यास ४० वर्षे उलटूनही अद्याप प्रयोजन पूर्ण न होणे, परिणामी उक्त भुखंडावर मोठया प्रमाणात अतिक्रमण करुन अनेक प्रकारचे अवैध व्यवसाय व घातक रसायनांचा आणि वस्तूंचा साठा करण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, सदर उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची चोरीदेखील केली जात असणे, यासंदर्भात स्थानिक रहिवाश्यांनी चारकोप पोलीस ठाण्यात लेखी तक्रार करुनही पोलीस व पोलीस प्रशासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, पोलीस वा पालिका विभागाकडून कोणतीही प्रतिबंधात्मक कारवाई न होणे, परिणामी अतिक्रमणात होत असलेली वाढ, याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, सदर भूखडांचा योग्य वापर व्हावा याकरिता स्थानिक नागरिकांनी त्याठिकाणी बस स्थानक उभारण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.***"

श्री.संजय राठोड ( महसूल राज्मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, गरीब कुंभार समाजाला तत्कालीन शासनाने समाज कार्यासाठी, राहण्यासाठी सदर प्लॉट दिला होता. सदर जागेचा ताबा दि. 4.10.2010 रोजी देण्यात आला होता. सदर जागेचा ताबा देताना त्या जागेवर अगोदरच अतिक्रमण झालेले होते. एखाद्या संस्थेला जेव्हा जागेचा ताबा दिला जातो तेव्हा त्या जागेवर अतिक्रमण नसेल तरच संस्था त्या जागेचा उपयोग करु शकते. या समाजाकडे सदर जागेची ताबा पावती सुध्दा आहे. या जागेवर अतिक्रमण असून या ठिकाणी पाण्याची चोरी केली जात असून त्या ठिकाणी बाकीच्या भानगडी सुध्दा होत आहे. शासनाने या विषयाच्या संदर्भात सांगितले आहे की, "हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे." परंतु हे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही. या संस्थेच्या अटी व शर्थीसाठी हे प्रकरण न्यायालयात आहे. या संस्थेने ताबा घेतल्यानंतर या जागेवर ज्यांनी अतिक्रमण केले होते ते लोक कोर्टात गेले होते. परंतु कोर्टाने त्यासंदर्भातील स्टेटस्को ऑर्डर काढून टाकलेली असल्यामुळे त्या जागेवरील अतिक्रमण ताबडतोबीने काढणे शक्य होणार आहे. त्यामुळे शासन या जागेवरील अतिक्रमण काढून हा प्लॉट संस्थेच्या ताब्यात किती दिवसात देणार आहे ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, मौजे चारकोप,ता.बोरिवली येथील सर्व्हे नंबर 41 मधील 6 एकर जमीन कुंभार कला सहकारी संस्थेला विटा, मडकी तयार करण्यासाठी भाडेपट्टयाने दि.8.4.1971 रोजी मंजूर करण्यात आला होता. मधील काळात या संस्थेने अटी व शर्थीचा भंग केला म्हणून दि.25.5.1985 रोजी सदर भाडेपट्टा रद्द करण्यात आला होता. परंतु त्यानंतर कुंभार कला सहकारी संस्थेला गृहनिर्माण संस्थेसाठी ही जमीन दि.4.10.2010 रोजी देण्यात आली होती.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड...

सदर भूखंडावरील अतिक्रमण धारकांविरुद्ध महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली,परंतु त्या कारवाईच्या विरोधात अतिक्रमणधारक दिवाणी न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले. त्यामळे सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. दिवाणी न्यायालयाने महानगरपालिकेस मनाई हुकूम बजावलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सदर भूखंडावरील पाण्याच्या चोरी संदर्भात प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, अशी चोरी केल्याचे आढळून आले नाही. न्यायालयाचा निर्णय तपासून अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात शासन प्रयत्न करणार आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, या प्रकरणी न्यायालयाने कोणताही स्टे दिलेला नाही. मंत्री महोदयांकडे चुकीची माहिती आली आहे. माननीय मंत्र्यांनी ही माहिती तपासून घ्यावी. जर न्यायालयाचा स्टे नसेल तर ते अतिक्रमण ताबडतोब हटविण्यात येईल काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, न्यायालयाने स्टे दिला किंवा कसे हे तपासून घेण्यात येईल आणि त्याप्रमाणे महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, न्यायालयाने स्टे दिला नसेल तर ते अतिक्रमण किती दिवसांत काढण्यात येईल ? त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे हे शासन मान्य करीत आहे. माझ्याकडे ताबा रिसीट आहे, त्यामध्ये अतिक्रमण झालेले आहे, असे स्पष्ट म्हटलेले आहे. जर न्यायायालयाचा स्टे नसेल तर ते अतिक्रमण किती दिवसांत काढून त्या सोसायटीला दिलासा देण्यात येईल ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, न्यायालयाचा स्टे नसेल तर अतिक्रमण काढण्याचे आदेश महानगरपालिकेला देण्यात येतील.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. आता कुंभार कला जवळपास लोप पावत चालली आहे. कुंभार हे खरोखर कलाकार आहेत. त्यांच्या हातामध्ये उत्कृष्ट कला आहे. मला या गोष्टीचे समाधान वाटते की, मुंबई सारख्या शहरामध्ये सहा एकरचा प्लॉट कुंभारकलासाठी राखून ठेवण्यात आला. आपण त्या ठिकाणी कुंभारकला व्हिलेज करु शकतो. मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भातील केस न्यायालयात आहे. याचा अर्थ ज्यांनी हा भूखंड बळकावलेला आहे ते कारवाई झाल्यावर लगेच कोर्टात गेले आणि त्यावर स्टे आणला. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण....

संदर्भात सरकारने न्यायालात प्रतिज्ञापत्र दाखल केले पाहिजे की, हा भूखंड कुंभारकलेसाठी दिलेला आहे, त्या ठिकाणी कुभांरकलेचे एक गाव तयार करीत आहोत. त्या जागेवर कुंभार कला जोपासण्यासाठी छोटे छोटे लघुउद्योग सुरु केले तर ते चांगल्याप्रकारचे काम होऊ शकेल. तेव्हा मी केलेल्या सूचनांचा सरकार विचार करील काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले की, या प्रकरणी न्यायालयाने स्टे दिलेला आहे. त्यावर सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी सांगितले की, न्यायालयाने स्टे दिलेला नाही. तेव्हा ही बाब तपासून पुढील भूमिका घेण्यात येईल. परंतु आमच्या माहितीनुसार या प्रकरणी न्यायालयाने स्टे दिलेला आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार ही बाब तपासून निर्णय घेण्यात येईल.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेतील विषयाच्या अनुषंगाने मी एक गोष्ट सांगतो की, सन 1987 मध्ये श्री.सतीश प्रधान महापौर असताना ठाणे महानगरपालिकेने "मराठा मंडळ" या अधिकृत संस्थेला ठाणे येथील हरीनिवास नाक्यावर भूखंड दिला. या भूखंडावर एका गुजराती व्यापाऱ्याने अतिक्रमण केले. ते अतिक्रमण हटविण्यासाठी त्या मंडळाने आजपर्यंत खूप प्रयत्न केले. ज्यांनी त्या जागेवर अतिक्रमण केले त्यांना दुसरीकडे जागा देण्यात आली. तरी देखील त्यांनी तेथून अतिक्रमण काढलेले नाही. अतिक्रमण हटविण्याचे काम महानगरपालिकेने करावयाचे आहे. त्यांनी महानगरपालिकेची जमीन घेतली आणि भूखंडावरील अतिक्रमणही हटविलेले नाही. मराठा मंडळाने अतिक्रमण हटविण्यासाठी अनेक प्रयत्न केले, पण ते अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही. हे अतिक्रमण हटविण्यासाठी माननीय मंत्री महानगरपालिकेला आदेश देतील काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो नगर विकास विभागाशी संबंधित आहे. मी माझ्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सांगतो की, या प्रकरणामध्ये सरकारच्या वतीने अपील करण्यात आलेले आहे आणि न्यायालयाच्या आदेशानुसार तत्काळ कारवाई करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आपण उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी माहिती घेऊन मार्ग काढण्यात येईल.

**उप सभापती** : मी आपणास माहिती देत आहे आणि सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य असते.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी उचित कारवाई केली जाईल.

-------------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** :जळगाव महानगरपालिकेतील शिक्षकांना 13 महिने पगार न मिळाल्यामुळे एक शिक्षकाने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न

**मु.शी.** :जळगाव महानगरपालिकेतील शिक्षकांना 13 महिने पगार न मिळाल्यामुळे एक शिक्षकाने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न यासंबंधी डॉ.सुधार तांबे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भाई जगताप ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी नियम 101 अन्वये दिलेल्या पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जळगाव महानगरपालिका अंतर्गत शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांना एक वर्षापासून वेतन मिळालेले नसणे, राज्याचा 50 टक्के हिस्सा महानगरपालिकेने न दिल्याने हे शिक्षक गेल्या एक वर्षाहून अधिक काळ वेतनापासून वंचित राहणे त्यामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला असणे, अनेक दिवस हे आंदोलन चालू असून कुठलाही निर्णय न झाल्याने तेथील एका शिक्षकाने दिनांक 15 जुलै, 2015 रोजी विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे, गत अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित झाल्यावर देखील अद्यापपर्यंत कुठलीही कार्यवाही न होणे, याबाबत त्वरीत करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे आणि मी दिली होती. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे हे उपस्थित नसल्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना मांडत आहे.

सभापती महोदय, ही अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. जळगाव महानगरपालिकेच्या शाळांमध्ये काम करणाऱ्या 200 हून जास्त शिक्षकांना मागील 13 महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही म्हणून ते शिक्षक उपोषणास बसले होते. या शिक्षकांनी नवीन पिढी घडविण्याचे काम करायचे की स्वत:च्या कुटुंबाची दुर्दशा पहायची ? त्यांची ही दुर्दशा आम्ही अनेकवेळा शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. ते शिक्षक उपोषणास बसले होते त्यावेळी मी स्वत: त्यांना जाऊन भेटलो होतो. आपल्या काही मर्यादा आहेत हे मी समजू शकतो. आपण एकीकडे आरटीईनुसार शिक्षणाचा हक्क प्रदान करीत आहोत तर दुसरीकडे या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना 13 महिने वेतन द्यायचे नाही, हे बरोबर नाही. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माननीय न्यायालयाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेस 3 कोटी रुपये प्रतिमहा हुडको या वित्तीय संस्थेस आणि रुपये 1 कोटी रुपये प्रतिमाह जिल्हा मध्यवर्ती बँकेस देणे क्रमप्राप्त आहे. आम्हास हे कबूल आहे. या सर्व गोष्टी थांबू शकतील, पण शिक्षकांचा संसार कसा थांबविणार ? या देशामध्ये शिक्षणाचा हक्क कायदा लागू झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण देणे हे आपले कर्तव्य आहे. या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा पगार 13 महिने होत नसेल तर योग्य आहे काय ? या महानगरपालिकेची परिस्थिती डबघाईला आलेली आहे याची आम्हाला माहिती आहे. ती महानगरपालिका बरखास्त करावी असाही निर्णय झाला हे देखील आम्हाला माहीत आहे. प्रशासकीय गोष्टी बाजूला ठेवून जे 202 शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे पवित्र काम करीत आहेत, त्यांना 13 महिने पगार मिळालेला नाही. तेव्हा एक विशेष बाब म्हणून या प्रकरणी शासनाने लक्ष घालून त्यांचे रखडलेले वेतन अदा करणार काय ?

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

..6..

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी अतिशय मूलभूत प्रश्न विचारलेला आहे. मानव विकास निर्देशांक ठरविणारे शिक्षण हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. महानगरपालिकेचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा प्रपंच नेटका होत नसेल म्हणून अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षकांचे पगार होत नसतील तर ती खरोखर गंभीर बाब आहे. ही फक्त एका प्राधिकरणातील किंवा एका पालिकेतील गोष्ट नाही. राज्यभरात अशा अनेक महानगरपालिका आणि नगरपालिका आहेत. तेव्हा विषयाचा मागोवा घेऊन आवश्यक धोरणाबाबत शासनाने अलीकडे वेळोवेळी बैठका घेतलेल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील....

जळगांव महानगरपालिकेच्या बाबतीत मी दोन-तीन बैठका घेतल्या आहेत. यातील दोन बैठका मी माझ्या दालनात घेतल्या आहेत. त्या महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत कसे वाढवून द्यावेत, जेणेकरुन, कुपोषित बालकाला पोषक मूल्य देऊन त्यांना सुदृढ करता येईल, या बाबतचे रिफॉर्म्स आपल्यालाच महापालिकेला द्यावे लागतील. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या महापालिकेला कर्जाचे हप्ते देण्यासाठी चार-पाच कोटी रुपये लागतात. या मागील कारण असे की, महापालिकेने हुडको किंवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा हप्ता वेळेवर दिला नाही तर ते न्यायालयात जातात. त्यामुळे न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून त्यांचे पैसे अगोदर अदा करावे लागतात, नाही तर तो कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होतो. म्हणून या संदर्भातील 4 कोटी रुपये अदा केल्यानंतर पाण्याचे देयक किंवा इतर मूलभूत बाबींवरील देयकाची रक्कम अदा केली जाते. अन्न, वस्त्र, निवाऱ्याइतकाच शिक्षणाचा विषय महत्त्वाचा आहे. यात एक गोष्ट महत्त्वाची आहे की, यामध्ये शिक्षकांचे काहीही चुकले नसताना, राज्यात आरटीई अस्तित्वात असताना, 2009 चा बालकांचा मोफत आणि सक्तीचा अधिनियम असताना आणि राज्य सरकारने तो 2013 साली आत्मसात केला असताना, या गोष्टींचा मागोवा घेऊन ठरवावे लागेल की, या शिक्षकांच्या पगाराचे दायित्व नेमके कोणाचे असेल ? हे दायित्व जसे महापालिकेचे असेल, शासनाचे असेल तसेच ते आपले सुध्दा सामाजिक दायित्व आहे. महोदय, या विषयी गेल्या दोन महिन्यांपासून आम्ही प्रयत्न करीत आहोत. तेथील स्थानिक गाळे असतील, विकास असेल या अनुषंगाने आम्ही प्रयत्न करीत आहोत. किंबहुना, या शिक्षकांचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही पोटतिडिकीने प्रयत्न करीत आहोत. जळगाव महापालिकेतील शिक्षकांचा 13 महिन्यांचा पगार थकीत आहे. हा पगार देण्याच्या दृष्टीने यापूर्वी सुध्दा प्रयत्न करण्यात आलेले आहेत. महापालिकेच्या एकूण पगारापैकी 50 टक्के रकमेचे दायित्व शासनाने द्यावयाचे आहे. शासनाच्या दायित्वाची रक्कम अगोदरच पोहचलेली आहे. त्या महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी शासनाकडे रोडमॅप तयार आहे. मला विश्वास आहे की, येत्या महिना-दीड महिन्यात मी यातून नक्की मार्ग काढेन.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी विभागाला डिफेन्स करणारे उत्तर दिले आहे. अशा प्रकारची अवस्था केवळ जळगाव महापालिकेतच आहे असे नाही तर,

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते....

भिवंडी, कल्याण, उल्हासनगर या ठिकाणी सुध्दा हीच अवस्था आहे. या ठिकाणी सुध्दा शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नाहीत. एवढेच नव्हे तर निवृत्त झालेल्या शिक्षकांना सुध्दा वेळेवर निवृत्तीवेतन मिळत नाही. सध्या शासनाकडे पगारापोटीची 10-15 कोटी रुपयांची थकबाकी आहे. महापालिकेतील शिक्षकांच्या एकूण पगाराच्या 50 टक्के अनुदान शासन देते आणि उर्वरित 50 टक्के रक्कम संबंधित महापालिकेने देणे आवश्यक आहे. जळगाव महापालिकेचे एका महिन्याचे वेतन 1 कोटी 60 लाख रुपये आहे. शिक्षकांनी आंदोलन केल्यानंतर एक महिन्याचे 81 लाख रुपये वेतन दिले आहे. या विषयी मी महापालिका आयुक्तांशी चर्चा केली. त्यांनी ताबडतोब एक महिन्याचे वेतन दिले. परंतु अजूनही 13 महिन्यांचे वेतन देणे बाकी आहे. हा विषय मार्गी लावण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था हा पैसा देऊ शकत नाही असे माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले. महोदय, यातून खऱ्या अर्थाने मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. मुळात या शिक्षकांना पगार देण्याचे दायित्व शासनाचे आहे. परंतु महापालिका आपल्या हिश्श्याचे 50 टक्के अनुदान देत नसेल तर धोरणामध्ये बदल करुन, त्या शिक्षकांचे पूर्ण वेतन स्वत: देण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा निर्णय आज जाहीर झाला नसल्यामुळे मी त्याबाबत विस्तृतपणे सांगू शकत नाही. मी अगोदर सांगितले की, या बाबतीत काही रिफॉर्म्स निर्माण करुन, या पॉलिसीचा मागोवा घेत, शिक्षकांच्या पगारापोटीचे अनुदान कसे पोहचते होईल हे बघितले जाईल. यामध्ये शिक्षकांची काही चूक नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विशिष्ट पेमेंट अदा करण्याच्या बाबतीत प्रायॉरिटीज असतात. राज्य सरकारने महापालिकांना शिक्षकांच्या पगारासाठी पाठविलेली 50 टक्के रक्कम दुसरीकडे खर्च केलेली आहे. म्हणून हे कोठे तरी थांबले पाहिजे. दिनांक 1 ऑगस्ट, 2015 पासून एलबीटी ला पर्याय म्हणून राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देणार आहे. त्यावेळी हे अनुदान देताना शिक्षकांचा पगार प्रथम प्राधान्याने देण्याच्या बाबतीत क्लॉज टाकता येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या विषयी मंत्री महोदय सकारात्मक आहेत. मी त्या गोष्टीचे स्वागत करतो. परंतु मी आरटीईच्या पार्श्वभूमीवर बोललो. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

मोते यांनी परंपरागत गोष्टींचा उल्लेख केला. या सर्व महापालिकांमध्ये माझ्या युनियन आहेत. मी महापालिकांशी भांडून कर्मचाऱ्यांना पगार मिळवून देतो. भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ या ठिकाणी मला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी प्रत्येक महिन्याला झगडावे लागते. मी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सांगत आहे. मी शिक्षकांच्या बाबतीत बोलत नाही. कारण ते माझ्यापर्यंत आले नव्हते. परंतु मी जळगाव जिल्ह्याचा प्रभारी असल्यामुळे ते माझ्याकडे आले होते. त्यामुळे या दृष्टीने सरकारला लांब पल्ल्याची काही उपाययोजना करावीच लागणार आहे. आरटीईच्या पार्श्वभूमीवर सरकारला या संदर्भात कार्यवाही करावीच लागेल. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, बँक किंवा हुडकोकडून घेतलेल्या कर्जाचा हप्ता प्राधान्याने देण्याबाबत कोर्टाचे निदेश आहेत. परंतु माझ्या माहितीनुसार कोर्ट कधीही असे सांगणार नाही की, कर्मचाऱ्यांचे पगार थकवून सदरहू पेमेंट अगोदर करावे. या देशाचा आणि राज्याचा स्टॅण्डर्ड कायदा आहे की, काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार प्रथम केला पाहिजे. त्यामुळे न्यायालय कधीही कर्मचाऱ्यांचे पगार थांबविण्याबाबत सांगणार नाही. कारण हा प्रचलित कायदा आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितले त्याला माननीय राज्यमंत्र्यांनी दुजोरा सुध्दा दिला आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी महिन्या-दोन महिन्यात या विषयी संबंधितांशी चर्चा करुन मार्ग काढावा. त्या बैठकीला आम्हा सदस्यांना आणि संबंधित अधिकाऱ्यांना बोलवावे. त्या बैठकीत आपण सकारात्मक निर्णय घ्यावा. महोदय, आम्ही आंदोलन केले म्हणून शिक्षकांना एक महिन्याचा पगार मिळाला. जून-जुलै महिन्यात शाळा-कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरु होते. शिक्षकांच्या मुलांना सुध्दा प्रवेश घ्यावा लागतो. परंतु त्यांचे पगार झालेले नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेश व शिक्षणाची अडचण येते. दरम्यानच्या काळात 527 शिक्षक निवृत्त झाले असून, त्यांना अजूनपर्यंत पेमेंट अदा झालेले नाहीत. वास्तविक पाहता शिक्षक हे ज्ञानदानाचे काम करतात. मला वाटते एकाच टप्प्यात 13 महिन्यांचा पगार देणे शक्य नसेल तर सुरुवातीला तीन-चार महिन्याचा पगार अदा करावा. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, या शिक्षकांना तीन-चार महिन्यांचा पगार तत्काळ अदा करण्यात येईल काय ?

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जळगाव महापालिकेला कर्जाचे हप्ते देण्यासाठी पैसे आहेत, परंतु शिक्षकांचे पगार देण्यासाठी पैसे का नाहीत, असे विचारले होते. त्यामुळे मी उत्तरात सांगितले की, महापालिकेवर न्यायालयाचे बाईंडींग असल्यामुळे अगोदर कर्जाचे हप्ते द्यावे लागतात. त्यामुळे माझी या बाबतीत नकारात्मक भूमिका नव्हती. सन्माननीय सदस्यांनी तीन-चार महिन्यांचा पगार देण्याची मागणी केली आहे. या शिक्षकांना पगार मिळत नाही म्हणून त्यांना जहर घेणे भाग पडते, ही भूषणावह बाब नाही. मी स्वत: पदवीधरांचे प्रतिनिधित्व करतो. शिक्षक हे समाज घडविण्याचे, समाजाला दिशा दाखविण्याचे आणि पुढील पिढी घडविण्याचे काम करीत असल्यामुळे त्यांच्यावर अशी वेळ येणे योग्य नाही. त्यामुळे मी संबंधितांना फोनवर बोलवून घेऊन बऱ्याच गोष्टींवर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. आम्ही या शिक्षकांचा 13 महिन्यांचा थकीत पगार आणि निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत पेन्शन देण्याचा मार्ग सुकर केला आहे. येत्या काही दिवसांत या विषयी कार्यवाही करून घेऊ. तसेच सन्माननीय सदस्यांनी सुचविल्यानुसार तातडीने या शिक्षकांना इमर्जन्सी रिसोर्स म्हणून तीन-चार महिन्यांचा पगार देता आला तर त्या दृष्टीने सुध्दा प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, महापालिकेच्या शाळांतील शिक्षकांचे पगार ही समस्या एकाच कारणापुरती आहे आणि ती म्हणजे खाजगी शाळांना 100 टक्के अनुदान दिले जाते. परंतु नगरपरिषदा आणि महानगरपालिकांच्या शाळांना 50 टक्के अनुदान दिले जाते. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार शिक्षण कर घेत असल्यामुळे शासन खाजगी संस्थांप्रमाणेच नगरपरिषद आणि महापालिकांच्या शाळांना 100 टक्के अनुदान देणार काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ऑटोनॉमस असते. त्यामुळे त्यांनी त्यांचा प्रपंच कसा चालावावा यासाठी त्यांचे कॉन्स्टीट्युशन आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या शाळांना 50 टक्के अनुदान दिले जाते त्या अनुदानित शाळा आहेत. त्या अनुदानित असल्या तरी त्या जिल्हा परिषदेच्या शासकीय शाळा म्हणून गणल्या जातात. त्यामुळे त्या शाळांचे पूर्ण दायित्व आमचे आहे. या बाबतीत सन्माननीय सदस्यांची सूचना असू शकते, त्यामुळे या बाबतीत सुध्दा सकारात्मक दृष्टीने विचार करू.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

------- नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना संपल्या आहेत. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा सुरू होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.40 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(दोन्ही बाजूकडील काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**सभापती :** सर्वप्रथम सन्माननीय सदस्यांनी आपल्या हातातील फलक सभागृहाबाहेर घेऊन जावेत.

(दोन्ही बाजूकडील काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**सभापती :** सभागृहाची बैठक मी 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.00 ते 12.20 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------------

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे )**

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन वेलमध्ये घोषणा देतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता ठेवावी. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 20 मिनिटांनी दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दिपकराव साळुंखे)**

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

**तालिका सभापती (श्री.दिपकराव साळुंखे)** : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता राखावी. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित करण्यात येत आहे, सभागृहाची बैठक मंगळवार दिनांक 28 जुलै, 2015 रोजी दुपारी 01.00 वाजता पुन्हा भरेल. सोमवारी आषाढी एकादशी आहे, सर्व सन्माननीय सदस्यांनी पांडुरंगाचे दर्शन घेऊन शुध्द मनाने व शुध्द अंत:करणाने मंगळवारी सभागृहात यावे.

(सभागृहाची बैठक 01 वाजून 01 मिनिटांनी मंगळवार दिनांक 28 जुलै, 2015 रोजीच्या दुपारी 01.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION